# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २१ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २९/११/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.**२९/११/२०१९ शुक्रवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री.ढेकळे सदाशिव गणपत | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री.पोकळे दिलिप बबनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री.खडके सुनिल वामनराव | श्री.भंगाळे विष्णु रामदास |
| श्री.सनकत चेतन गणेश | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख सैईदा युसुफ |

सदर सभेस, मा.उपायुक्त. श्री. अजीत मुठे, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, मा.उपायुक्त . उत्कर्ष गुटे, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्य श्री.पाटील राजेंद्र झिपरू तसेच श्री.कोल्हे प्रविण रामदास यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते . अध्यक्ष महोदय यांनी मंजूर केलेले आहेत.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला.

| अ.क्र. | सन्मा.सदस्याचे नांव | श्रध्दांजलीचा प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | ढेकळे सदाशिव गणपत | भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा अध्यक्ष कै.उदयजी वाघ यांचे हद्यविकाराचे तिव्र झटक्याने दि.२८/११/२०१९ रोजी दुख:द निधन झालेबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दुःखद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दुःख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दुःखात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सन्मा.सभागृह, एक अभिनंदनाचा प्रस्ताव मांडु इच्छितो, कालच शिवसेना प्रमुख श्री.उदध्वजी ठाकरे साहेब हे मुख्यमंत्री पदी विराजमाण झाल्याबद्दल आपल्या सभागृहातर्फे मी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे. त्यांच्यासोबत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस मंत्री मंडलामध्ये महाविकास आघाडी म्हणुन जे सरकार स्थापन झालेला आहे.नक्कीच ही वेगळी सुरुवात महाराष्ट्रासाठी आहे. पुढील काळामध्ये सर्वांना घेऊन चालता येईल असा नेतृत्व मा.श्री.उदध्वजी ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली सुरु झालेला आहे. शेतकऱ्यांना, सर्व सामान्यांना दिलासा मिळणार नेतृत्व, ज्या गोष्टीकडे सरकारनी विषय वेगल पाहिजे. नक्की आधी पासुन आपले पक्षप्रमुख याकडे लक्ष देत आहे. नक्कीच मी त्यांच्यासोबत असलेले या पक्षाला सपोर्ट करणारे मा.सोनियाजी गांधी, शेतकऱ्यांवर वावरजुन लक्ष देणारे जाणताराजा मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांचा सुध्दा मी मनपुर्वक अभिनंदन करतो की त्यांनी ही सरकार स्थापन करण्यामध्ये चांगलीच भुमिका घेतली. नक्कीच आमची महाविकास आघाडी महाराष्ट्राचा विकास करेल अशे दोन शब्द बोलुन थांबतो. धन्यवाद.

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचा प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | भंगाळे विष्णू रामदास | दि.२८/११/२०१९ रोजी महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होवून महाराष्ट्र राज्याचे २९वे मुख्यमंत्री म्हणून शिवसेना पक्ष प्रमुख, मा.श्री.उध्दवजी बाळासाहेब ठाकरे विराजमान झालेबद्दल तसेच कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले यासाठी मा.श्रीमती सोनीयाजी गांधी व जाणता राजा मा.श्री.शरदचंद्रजी पवार यांनी |

| | | |
|---|---|---|
| | | सहकार्य केलेबद्दल यासर्वांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने सर्वांचे अभिनंदन करीत असुन शुभेच्छा देत आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष श्री.उदयजी वाघ यांच दुखद निधन झाल. याचा श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडतो. व सर्वांनी दोन मिनट उभे राहवे. जिल्हा अध्यक्ष विष्णु भाऊ यांनी या ठिकाणी ठराव मांडला,आपल्या महाराष्ट्रचे नविन मुख्यमंत्री तिघ पार्टी मिळुन भारतीय जनता पार्टी होती नाही. मी सुध्दा अभिनंदन करतो आणि अभिनंदन करतो, मी सुध्दा शिवसेनेचा जिल्हाप्रमुख होतो. आमचे सर्व सहकारी या ठिकाणी आहे. अपेक्षा करतो की, जळगांव महापालिकेला शासनाच्या वतीने जे काही अडचणी येत असतील ते सर्व मिळुन सोडु या. मी खास करुन विष्णु भाऊ, नितीन भाऊ, यांच्या वतीने, या ज्या समस्या शासनाच्या वतीने अडचणी येतील ते सोडुन देतील अशी अपेक्षा करतो. त्यांनी सुध्दा शब्द दिला पाहिजे की, शासनाच्या वतीने जे काही अडचणी असतील ते आपण सोडुन देऊ. विष्णु भाऊंकडुन अपेक्षा करतो, जय हिंद जय महाराष्ट्र.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नक्कीच मा.ढेकळे बाबा आधी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख होते. बरेच वर्ष राहिलेले आहे.आता काही वर्ष झालेपासुन तिकडे गेले असतील. त्यांनी आशा प्रकट केली परंतु येणारे काळामध्ये काही अडचणी असल्यातर आम्ही तुमच्या खांद्याला खांदा करुन या जळगांव शहराच्या विकासाच्या दृष्टीने आपल्या बरोबर राहु. याची गॅरंटी आम्ही शिवसेनेच्या माध्यमातुन देऊ परंतु आपण राजकारण न करता नक्कीच आपण काही गोष्टी चांगल्या प्रकारी साध्य केल्या तर ते होण्यास विलंब लागणार नाही. अस मला वाटत. धन्यवाद.

**नगरसचिव :- विषय क्र. १.** दिनांक १४/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.चेतन सनकत :-** सभेस उपायुक्त श्री.उत्कर्ष गुटे हे हजर होते परंतु त्यांचे नाव कुठेच दिसत नाही. तरी त्यांचे नाव ॲड करावे आणि सदर दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करावे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.१४/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभा कामकाजाममध्ये उपायुक्त, श्री.उत्कर्ष गुटे उपस्थित होते परंतू कार्यवृत्तामध्ये त्याची नोंद घेण्यात आलेली नाही. तरी दि.१४/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभा कामकाजामध्ये उपायुक्त, श्री.उत्कर्ष गुटे उपस्थित होते अशी कार्यवृत्तामध्ये नोंद घेवुन दि.१४/११/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त दुरुस्तीसह कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

***अनुकुल मते :- ११*** ***प्रतिकुल मते :- ००***

***सुचक :- सनकत चेतन गणेश***

***अनुमोदक :-पोकळे दिलीप बबनराव***

**नगरसचिव:- विषय क्र. २)** सर्व साधारण रस्ते अनुदान मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग समिती क्र.०३ मधील वार्ड क्र.१३ व १४ मधील डांबरी रस्ते दुरुस्ती करणे कामी मक्तेदार पी.एस.कुमावत अन्ड कंपनी यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दरानुसार रक्कम रु.२५,५८,५२९/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करावा .आता या विषयामध्ये वॉर्ड क्रं. लिहीले आहेत . जळगांव शहरात आता जी प्रभागांची रचना करण्यात आलेली आहे. प्रभाग क्रं. १३ व १४ असे लिहीले पाहीजे वॉर्ड लिहीलेले आहेत. आणि साहेब कुठे चालु आहे प्रभाग क्रं. १३ आणि १४ मध्ये याचीही थोडी माहिती सभागृहापुढे दिली तर बर होईल.मला तर अशी माहिती मिळाली की अजुन डांबर आलेले नाही .मी तपास केला तर अशी माहीती मिळाली होती.

**श्री.दिलीप पोकळे :-** प्रस्तावास माझे अनुमोदन आहे.

**शहर अभियंता , श्री.सुनिल भोळे :-** भाऊ , सभापती ताई विषय आज मंजुर होतोय त्यानंतर त्यांच्याशी करारनामा करून कार्यादेश दिला जाईल मग कामाला सुरूवात होईल. परंतु मक्तेदाराने ते काम मॅरेथॉन च्या वेळेस हे काम दोन तीन दिवसानंतर त्याने कार्यादेश देण्यापुर्वी त्याने कामास सुरूवात केलेली होती .

**श्री.दिलीप पोकळे :-** हया मक्तेदाराला आपण काम देतोय आपण तर ५ टक्के जास्तीच्या दराने का देतोय याची माहिती सभागृहास देण्यात यावी.

**शहर अभियंता , श्री.सुनिल भोळे :-** मनपा फंडाचे काम आहे. त्यांना आपण वेळोवेळी ते मजुर शिफ्ट करावे लागतात .होणारे काम ज्या स्पीड ने व्हायला पाहीजे किंवा क्वालीटीने होते , रिपेअरींगचे काम तसं होत नाही रिपेअरींग चे काम कसे जसे जसे ट्रक्टर पुढे सरकते तसे तसे काम होतं . त्याच्यामुळे आपण हे काम त्यांना देतोय आणि दुसरे असे की वेळेवर आपण त्यांना पेमेंट नाही करू शकत.

**श्री नितीन बरडे :-** प्रभाग समिती ३ मध्ये कोणते काम सुरू होताय.

**शहर अभियंता , श्री.सुनिल भोळे :-** भाऊ प्रभाग क्रं. १२ चे जे टेंडर आहेत ते पुढच्या महासभेपुढे ठेवणार आहे.

**श्री नितीन बरडे :-** कारण की गेल्यावेळेस काय झाले होते तुम्हालाही माहिती आहे. ते आमच्या भागापर्यंत पोहोचलंच नव्हतं तर आमच्या भागातील कोण कोणते घेतलेले आहेत त्याची माहिती आम्हाला लेखी स्वरूपात देऊन द्या. की हे रस्ते घेतलेले आहेत तुमचे .

**शहर अभियंता , श्री.सुनिल भोळे :-** भाऊ प्रभाग क्रं. १२ चे जे कामं असतील त्यांची नावं देतो .

**श्री नितीन बरडे :-** ओके.

**मा.सभापती :-** आता यापुढे प्रस्ताव सादर करतांना प्रभाग क्रं. ची नोंद घेवुन मग पुढे प्रस्ताव सादर करण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सर्व साधारण रस्ते अनुदान मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग समिती क्र.०३ मधील प्रभाग क्र.१३ व १४ मधील डांबरी रस्ते दुरुस्ती करणे कामी आयुक्त मनपा यांनी दि. ३१/०८/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि. ३१/०८/२०१९ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.१४३७ सन २०१९-२० मनपा च्या संकेत स्थळ *www.jcmc.gov.in* वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.६२० दि. १३/०९/२०१९ चे पत्रान्वये वर्तमान पत्रात दि. १५/०९/२०१९ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०३ मक्तेदाराचे ई-निविदा प्राप्त झालेले आहेत. त्यात मक्तेदार श्री.पी.एस.कुमावत ऍ़न्ड कंपनी यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १५% जास्तचे दर सर्वात कमी आले. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटी साठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीस न येता त्यांनी दि.१३/११/२०१९ रोजी सा.बा.आ.क्रं. २७४६ दि.१३/११/२०१९ अन्वये सदरचे काम निविदा रक्कमेवर ५% जास्तीच्या दरात करण्याची लेखी संमती दिली आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु. २५,५८,५२९/- मात्र अपेक्षीत खर्च आहे सदरचा खर्च हा रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षातुन करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार श्री.पी.एस.कुमावत ऍ़न्ड कंपनी यांचे वाटाघाटी अंती दिलेले दर स्विकृत करण्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नसार रक्कम रु.२५,५८,५२९/- मात्रची संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :-पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडीमधील शिक्षिका व मदतनिस शिक्षिका यांना दिनांक ०२/१२/२०१९ एक दिवसाचा खंड देवुन दि.०३/१२/२०१९ ते १५/०४/२०२० पावेतो नविन नियुक्ती आदेश होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. सुनिल खडके :-** प्रशासनाच्या प्रस्ताव मान्य करावा . मागे आपण ३ नंबर शाळेमध्ये पिपल्स बँकेस इंग्लिश मिडीयम चालवायला दिलेले आहे. तर तिथे ते इंग्लिश मिडीयम शाळा ते चालवतात पण आमच्या वॉर्डातील किंवा एरीयातील म्हणा , जुने जळगांव भागातील म्हणा कुणाला ॲडमिशन हवी असेल तर ते म्हणतात की फुल झालेली आहे. म्हणजे एखादी लेटर आपण जर पाठविले की सदर व्यक्तीला ॲडमिशन द्या आमच्या जवळचे लोकं आहेत किंवा गरीब आहेत.किंवा झोपडपट्टी मध्ये राहणारे आहेत स्लम एरिया मधील आहेत. तर ते घेत नाही . तरी आपण त्यांना या बाबतीत सुचना करावी व आपण ठरवुन घ्यावे की त्या एरियातील नगरसेवक जे असतील तर दोन तीन मुलं तिथे ॲडमिशन करीता घेण्यात यावे. अशी मी सुचना करतो .

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** नगरसेवक लोकांना त्या प्रभागातील नागरीक येतात. या शाळेत जे जातात ते गरजु मुल असतात आणि नगरसेवकाच्या पत्रानंतरही जर काम होत नसेल तर तो समाधान चुकीचा असेल. तर असे होऊ नये याची दक्षता घ्यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव अंतर्गत चालणाऱ्या बालवाडी विभागाकडील सेमी इंग्रजी माध्यमाच्या २१ शिक्षिका व १० मदतनिस तसेच मराठी माध्यमाच्या बालवाडीतील ९ शिक्षिका व १२ मदतनिस असुन यांना दि. ०२/१२/२०१९ रोजी एक दिवसाचा खंड देवुन मानधन तत्वावर नविन नियुक्ती आदेश दि.०३/१२/२०१९ ते दि.१५/०४/२०२० पावेतो देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ मधिल तरतुदी नुसार मानधन तत्वावर नियुक्ती करणेस व सदर कामी येणारा मानधन खर्च रक्कम रु.११ लक्ष मात्र महिला व बालकल्याण निधीतून करणेस तसेच मदतनिस शिक्षिका यांना नविन नियुक्ती आदेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने बालवाडीत प्रवेश घेणाऱ्या मुलांची संख्या वाढवावी व बालवाडीत मनपा सन्मा.सदस्यांनी शिफारस केलेल्या मुलांना सुध्दा प्रवेश देणेबाबत बालवाडी विभाग वसंबंधीत शिक्षिका यांना सूचना दयाव्यात.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- खडके सुनिल वामनराव**

**अनुमोदक :-दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** पिंप्राळा रेल्वे गेट क्रं.१४७/३-T येथे उड्डाणपूल बांधकाम करणेकामी पिंप्राळा गावाकडे प्रस्तावित मार्गाबाबत रेल्वे विभागाने तयार केलेले आराखडयास संमती देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मा.सभापती, बोगदा नाही. आर्म होणे आवश्यक आहे. आर्म टाकणे कामी लागणारा सविस्तर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करावा तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवण्यात यावा.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** याला विलंब लागण्याच कारण काय ? मागील काळामध्ये काही नोटीसा आपण त्या रोडावर येणाऱ्या नागरीकांना दिल्या होत्या. ते आपण त्यांना देऊ शकतो का ? त्या माध्यमातुन रोडाची किंवा पुलाची संकल्पना काय ? या प्रकरणाची माहिती हवी. सभापती महोदया, पुल होण गरजेचे आहे. बोगदा सगळया गोष्टींचा विचार करायला पाहीजे.

**मा.सभापती :-** होय बोगदा महत्वाचा नाही कारण बोगदा झाला तर काय होणार आहे. समजा आपण बोगदा जर केला तर बोगद्यामध्युन जाणाऱ्या वाहनांची संख्या आणि कोणत्या प्रकारची वाहने याला काहीतरी मर्यादा असणार आहे. त्यानंतर बोगदा म्हंटल्यानंतर तिथे सगळया ऋतुमध्ये वाहतुक होऊ शकणार नाही. म्हणजे जेव्हा पावसाळा येईल , पावसाळयात टु व्हिलर ही जाणार नाही. किंवा हेवी व्हेईकल्स जाणे अशक्य होणार आहे. त्यामुळे तिथे आर्म असणेच आवश्यक आहे. हि आमची भारतीय जनता पार्टीची सुध्दा हीच भुमिका आहे. आणि ते आर्म होण्यासाठी प्रशासनाकडुन तसा सविस्तर अहवाल आपल्याकडे येणं अपेक्षित आहे. आता ईथे जी टिप्पणी दिलेली आहे त्यांच्या मध्ये विभाग प्रमुखांचा अहवाल आहे. हा मोघम स्वरूपाचा आहे. म्हणुन आम्ही हा विषय तहकुब ठेवतो आहे. विषयाची घाई आम्हालासुध्दा तेवढीच आहे. खर तर हा विषय पेंडींग पडायलाच नको आहे. आणि आत्ताच आमच्या सदस्यांची सुचनाच ही आहे की ताबडतोब आर्म करण्यासाठी काय काय करावे लागणार आहे. याचा विभाग प्रमुखांनी सविस्तर अहवाल द्यावा. म्हणजे पुढच्या सभेमध्ये आपण याच्यावर निर्णय घ्यायचा .

**श्री.विष्णु भंगाळे :-** याच्यामध्ये कसे आहे मॅडम की आज जर का हा पुल होणार आहे तर तिकडील खुप मोठा एरिया जळगांव शहराच्या हद्दीत वाढत चाललाय .येणाऱ्या काळामध्ये आग लागली जर काही घटना घडली त्यावेळी इकडुन गाडया सुध्दा जायला हव्यात.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** त्याकरीता पिंप्राळा कडुन प्रस्ताव आहे. अभ्यास करुन.

**मा.सभापती :-** याच जेवढ अभ्यास मी केलेल आहे. सिमांकण होण खुप आवश्यक आहे. रेल्वेची जी भिंत आहे ती जर आपल्या हद्दीत सरकलेली आहे. ते सुध्दा प्रशासनाचा काम आहे की प्रशासनाच्या लक्षात आणुन द्यायला पाहिजे. जर लेआऊट पुढे गेला तर ते पुढे का सरकला.आपल्याला काय उपाय योजना करता येईल. हे सुध्दा सविस्तर येथे येणे अवश्यक आहे. आणि त्यानंतर आर्म कसा बसवता येईल. त्या प्रमाणे सादर करावा.

**श्री.सुनिल भोळे :-** या संदर्भात आज धामणे साहेब नाही. धामणे साहेब असते तर त्यांनी योग्यपणे सांगितलं असत.तो जो रस्ता आहे. पिंप्राळा रेल्वे गेटचा तो १८ मिटर डी.पी.रोड आहे. तो १८ मिटर पुर्णपणे नाही. त्याच काही भाग एगजीस्टींग आहे काही भाग नाही. त्याला विडथ नाही. यश लॉन पर्यंत आहे. यश लॉनच्या पुढे तो मिळत नाही.कमी जास्त दिसुन येतो. जवळपास ६ मिटर पर्यंत आणि ६ मिटरच्या रस्त्यावर आर्म उतरविणे अशक्य आहे. अस तिथे वाटत. आणि आज जे ते म्हणत आहे. तर ते त्यांच्या हद्दीमध्ये आहे आपल्या हद्दीमध्ये नाही आपल्याला जर आर्म उतरवायचे असेल. त्यापुर्ण रस्त्यावर १८ मिटर आखुन त्या पुर्ण लोकांच हे ताब्यात घ्याव लागेल आपल्याला. आणि मग तो दुरुस्त होणार.

**मा.सभापती :-** एकदा तुम्ही हे पुन्हा करा.एकदा तपासणे आवश्यक आहे आणि प्रॅापर सिमांकन होणे आवश्यक आहे. आणि जर भिंत पुढे आलेली असतील तर ती कशी आलेली आहे काय आहे. हे सर्व रेकॅार्डवर आल पाहिजे. माझ्या माहिती प्रमाणे त्यांना आर्मसाठी नोटीसा सुध्दा दिलेली आहे. मग त्याची पुढची सुनावणी का झाली नाही. ती कशी होऊ शकते आपण हे सगळ किती लवकर करु शकतो. तसा सविस्तर अहवाल सभागृहामध्ये होण आवश्यक आहे.

**श्री.इस्माईल शेख टि.पी.** :- नोटीसा फिरविण्याच काम बाकी आहे. ते उद्यापासुन सुरु करतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पुढच्या सभेपर्यंत आल पाहिजे.

**मा.सभापती :-** या रिपोर्ट वर तुम्ही थोड विस्तृत अहवाल द्या. माझ म्हणण हे आहे. आपल जे सिमांकन आहे ते आपण निट केलेल असल्यामुळे हे अस होत आहे. अस प्रत्येक्षात नाही म्हणुन याच अहवाल सभेसमोर पुढच्या सभेपर्यंत ठेवा.

**श्री.सुनिल भोळे :-** आता जे तिथे घर आहे ना त्या घरांना आपण नोटीसी ही दिलेली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, त्यांच्याकडे आता काही कल्पना असेल तर ते पण म्हणणं एकुन घ्याव सभागृहाने.

**मा.सभापती :-** सद्या आता मोजमाप करा. त्यांच म्हणणं आहे की, ते रितसर आहे. नसेल तर त्यांनी तस लेखी द्याव की अस नाही. पुढच्या स्थायी पर्यंत आपण याच्यावर निर्णय घ्यायच आहे. आणि दोघी पक्षांची आणि सभागृहाची ही हीच मागणी आहे. तिथे बोगदा ऐवजी आर्म होणे आवश्यक आहे. आता आर्म होण्यासाठी आपण काय काय करायला हव ते प्रशासनाने आपल्याला सुचवायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सदर ठिकाणी बोगदा ऐवजी आर्म होणे आवश्यक आहे. सबब आर्म टाकण्यासाठी कराव्या लागणाऱ्या पुर्ततांचा सविस्तर अहवाल सभागृहासमोर येणे आवश्यक आहे सबब सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवणेत येत आहे. प्रशासनाने सर्व तांत्रिक बाबी तपासून परिपूर्ण व अचूक प्रस्ताव तयार करुन पूढील होणाऱ्या स्थायी समिती सभेसाठी सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव:- विषय क्र.** ५) मुख्यलेखाधिकारी यांचेकडील जा.क्र./जमनपा/लेखा/५७७/२०१९ दि.२२/११/२०१९ अन्वये हुडको कर्ज एकरकमी परत फेड झालेल्या क्रमशा: कार्यवाहीच्या प्रस्तावाची माहिती घेणे.

**श्री. दिलीप पोकळे :-** प्रस्तावाची माहिती घेतली.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मी हे नाही विचारतो आहे की पुर्ण कर्जमुक्त झालं का ? आणि काय काय कर्ज बाकी आहे. मी काय काय कर्ज बाकी आहे ते विचारतो आहे.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** २५३.८३ कोटी अंतिम रक्कम भरायची होती. त्यातली २५० कोटी ही शासनाने भरली आणि ३ कोटी रक्कम ही महानगरपालिकेने भरली त्या २५३ कोटी मधुन महानगरपालिकेचा हिस्सा १२५ कोटी होता , तो महानगरपालिकेसजी एलबीटी ची ग्रॅंड येते त्या एलबीटीच्या ग्रॅंडमधुन दर महिन्याला तीन तीन कोटी रूपये कपात होताहेत. असे १२५ कोटी पैकी आतापर्यंत तीन तीन कोटी रुपयांचे तिन हप्ते आतापर्यंत कपात झालेले आहेत.

**श्री. विष्णू भंगाळे :-** आतापर्यंत आपल्याला आता आपण हे म्हणतोय की , एकरकमी आपण परतफेड केली तर आपल्याला किती वर्ष किती महिने द्यायचे आहेत.

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** ३ कोटी चे २९ हप्ते आहेत.

**श्री. विष्णू भंगाळे :-** २९ हप्ते म्हणजे २९ महिने बाकी आहे आपले

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** आणि त्या अडीचशे कोटी जे आहेत हे शासनाने भरले आहेत.

**श्री. विष्णू भंगाळे :-** २९ हप्ते भरायचे आहेत ते नाही बिनव्याजी जरी म्हटले तरी आपल्या महापालिकेचेच जाणार आहे ते काही आता येथे एकरकमी परतफेड म्हंटलेली आहे . मी याच्यावर म्हणतोय की येणाऱ्या काळात हेही मिळाले असते तर चांगलं झालं असतं. परंतु आम्ही यालाही अभिनंदनच करतोय . परंतु अजुनही आपल्याला २९ हप्ते दरमहिन्याला ३ कोटी भरायचे आहेत. आपल्यावर अजुन तितकं आहेच . पुर्ण निल झालेलं नाही.

**श्री नितीन बरडे :**- महानगरपालिकेचा याच्यावरती अजुन काही देण आहे का ?

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** यानंतर नगरसेवकांच मानधन असेल.

**श्री नितीन बरडे :**- रिटायर्ड कर्मचाऱ्यांच काही बाकी आहे का ?

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** रिटायर्ड कर्मचाऱ्यांचे दोन बिलं बाकी आहे. सेवाउपदार ६ कोटी रुपय दुसर अर्जित रजा ८.२१ कोटी रुपये

**श्री नितीन बरडे :**- पेन्शन वाल्यांच ?

**मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार :-** तेच सांगितल सर, सेवाउपदार आणि अर्जित रजा अस दोनच देण असत त्यांच.

**श्री नितीन बरडे :-** जो पर्यंत हप्त्यांच होणार नाही तो पर्यंत यांना देता येणार नाही. आपल्याकडे कर्मचाऱ्यांनी काम केलेले आहे. त्यांना ही पैसे दिले गेले पाहिजे. त्यांना ही देण्याची व्यवस्था करा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता जे थोडफार राहील असेल आमची विनंती आहे नविन सरकारने नविन सरकारचे प्रतिनिधी सुध्दा येथे आहे. त्यांनी हे उर्वरित भरुन आपल्याला कर्जमुक्त करावे.

**श्री.नितीन बरडे :-** सरकारने कुठे फेडले ते २९ महिन्या फक्त व्याज माफ केलेला आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सरकारने भरले. रु.१०० कोटी.

**श्री.नितीन बरडे :-** आपल्याला द्यायचे आहे त्यांना सरकारने हमी घेतलेली आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्यावेळेला ढेकळे साहेब आमच्यासोबत होते. त्यावेळेला डिआर.टी.कोर्टात आपण कमी पडले म्हणुन आज ऐवढी मोठी परिस्थिती आलेली आहे. आपण जर डी.आर.टी.कोर्टामध्ये लढलो असतो तर एतकी रक्कम सुध्दा भरण्याची गरज राहीली नसती हे सुध्दा लक्षात घ्या . कोर्टात हायकोर्टात आपला प्रतिनिधी गेलेला नाही . मला माहिती आहे हि दिशाभुल करू नका.

**श्री.सुनिल खडके :-** डिआरटी कोर्टामध्ये , पण हि जी नामुष्की आली होती ती बंद झालेली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही नाही नाही

**श्री.सुनिल खडके :-** तुमच्याच मुळे हे झालेले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हे पहा तुमच्या काळामध्ये कोणताही प्रतिनिधी गेलेला नाही .

**श्री.सुनिल खडके :-** डिआरटी कोर्टामध्ये तुमच्यावेळेला सर्व खाते बंद केलेले होते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हे पहा आमचा काळा काय आणि तुमचा काळ काय आमच्या काळात संधी दिली होती .

**श्री.सुनिल खडके :-** नाही हे जे कर्ज भरलं ना याच्यामुळे जी येणारी नामुष्की टळली होती **.** जी येत होती नामुष्की ती आता आपल्यावर येणार नाही .हे भाजपाच्या सरकारने केले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** पुन्हा का आली होती ते लक्षात आलं का.

**श्री.सुनिल खडके :-** पुन्हा आली होती म्हणजे

**श्री.विष्णु भंगाळे :-** विचारा अधिकाऱ्यांना विचारा पुन्हा का आली ते तर

**श्री.सुनिल खडके :-** भरल्यानंतर कुठे आली.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय, भरल्यानंरचा विषय कुठे आहे . त्याच्या आधी जी आपल्यावर नामुष्की आली होती . जेव्हा आपले व्यवहार बंद झाले होते, तेव्हा हायकोर्टामध्ये आपला प्रतिनिधी हजर झाला नाही . का हजर झाला नाही काय कारण होतं.

**श्री.सुनिल खडके :-** कुठे हजर झाला नाही हजर झाला ना.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हजर झाला होता की नाही हे माहिति आहे का तुम्हाला. माहिति आहे का.

**श्री.सुनिल खडके :-** मग माहिति आहे ना हजर झाला होता.

**श्री.विष्णु भंगाळे :-** माहिती घ्या आणि मग नंतर बोला समोर सभापती महोदय वकील आहेत . आणि मी वकील नाही.

**श्री.सुनिल खडके :-** डांगे साहेब स्वत: हजर झाले होते तिथे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही झाले होते.

**श्री.सुनिल खडके :-** मग झाले होते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही झाले होते.

**श्री.सुनिल खडके :-** मग झाले होते , माहिती घ्या पुर्ण.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** शांतता घ्या , आपली मागणी वेगळी आहे. असे बहस करून काही उपयोग नाही , आपल्याला आता हे आपल सरकार आहे आणि हे सरकारला शक्य आहे. या शहराच्या दृष्टीने मागच्या सरकारने जे काही केलं. जे थोडे फार राहीले आहे. ते भरायचे आहे . नविन सरकार चे काही तरी प्रयोजन करूया .आपण लागले तर भेटुया . म्हणजे जळगांव शहराला व्यवस्थित चांगले सुशोभित करण्याचं , सुंदर करण्याचं जे स्वप्न आहे ते साकार होईल. हाच विषय करा दुसऱ्या याच्यात काही अर्थ नाही. मागे आपणचं आपल्या पिरिएड मध्ये आपण हे केलेलं आहे. आणि आता आपल्यालाच फेडायचं आहे. करा होकार द्या आणि मंजुर करा. बहस करू नका.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मुख्यलेखाधिकारी यांचेकडील जा.क्र./ जमनपा/ लेखा/ ५७७/२०१९ दि.२२/११/२०१९ मध्ये नमूद हुडको कर्ज एकरकमी परत फेड झालेल्या क्रमशा: कार्यवाहीच्या प्रस्तावाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**
**अनुमोदक :-ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०१/०७/२०१९ ते दि.०७/०७/२०१९, दि.०८/०७/२०१९ ते दि.१४/०७/२०१९, दि.१५/०७/२०१९ ते दि.२१/०७/२०१९, दि.२२/०७/२०१९ ते दि.२८/०७/२०१९, दि.२९/०७/२०१९ ते दि.१८/०८/२०१९, दि.१९/०८/२०१९ ते दि.२५/०८/२०१९, दि.२६/०८/२०१९ ते दि.०८/०९/२०१९, दि.०९/०९/२०१९ ते दि.१५/०९/२०१९, दि.१६/०९/२०१९ ते दि.२२/०९/२०१९ व दि.२३/०९/२०१९ ते दि.२९/०९/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** आपली प्रोसेस कुठपर्यंत आली नविन गाडयांची चौथीवेळेस झालं आहे . नविन चेसीस घेवुन पडलेल्या आहेत.

**प्रभाग अधिकारी, श्री. विलास सोनवणी :-** निविदा मंजुर झालेल्या आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मागील काळामध्ये ज्या ज्या वेळेस प्रश्न विचारला आहे त्या त्या वेळेस हेच उत्तर मिळतं. मागच्या मिटींग मध्ये सुध्दा हेच सांगीतले होते की दोन दिवसांमध्ये त्याचा निर्णय लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आग लागल्यानंतर आपल्या गाडया उपलब्ध होत नाहीये.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता किती वर्ष झाले हया गाडया आलेल्या आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही कोणत्या विभागाला आहे सोनवणी साहेब वाहन विभागाला आहेत का तुम्ही.

**प्रभाग अधिकारी, श्री. विलास सोनवणी :-** नाही एस.एस.पाटील १५ तारखेपर्यंत रजेवर आहेत त्यांचा चार्ज माझ्याकडे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्हाला पुर्ण माहिती नाहीये .

**श्री.विष्णु भंगाळे :-** वाहन विभागात वाहनांची माहिती असलेला अधिकारी द्यावा. आपल खुप मोठ जळगांव आहे आपली महानगरपालिका आहे. व्हेईकल आपले मोठे आहे विविध याच्यातील तर आपण त्याच्यावर जसे डिप्लोमा असेलं त्या माध्यमातुन आजच्या तारखेला खुप मुलं बेरोजगार पण आहेत . त्यामाध्यमातुन आपण आपल्या काही अटी शर्ती मध्ये जर बसत असेल तर असा डिप्लोमा , मेकेनिकल डिप्लोमा झालेला मुलगाही घेतला तर तो सुध्दा चांगल लक्षं देईन , असं मल वाटतं. आपण दरवेळी नेहमी याच्याकडे चार्ज देतो , त्याच्याकडे चार्ज देतो. त्यामुळे त्याच्याकडे कुणीही पुर्णपणे लक्ष देत नाही. अध्यक्ष महोदय मी याच्याकडे आपलं लक्ष वेधु ईच्छितो की याला प्रॉब्लेम काय आहे. आरोग्याच्या इ केदाराला आपण आपल्या सर्व गाडया दिलेल्या आहेत. घंटागाडया दिलेल्या आहे. याच्या वरती नियंत्रण ठेवायला मिकॅनिकल इंजिनिअर असला तर तो त्याने घेतलेल्या कायकाळापासुन त्यानी एकदा तरी सर्व्हीसींग केलेली आहे का ? आजची जर परिस्थिती पाहिली ती गाडयांची तर ती इतकी भंगार झालेली आहे. त्याच्यावरती ड्रायव्हर कशे काम करत असतील त्यांनाच माहित असत. त्यांना ३ लिटर डिझल दिल जातो. आणि दिवसभर चक्कर मारायच.मी आरोग्य उपायुक्त यांचा अभिनंदन करतो की ३ लिटर डिझल मध्ये ऐवढ कचर वजन उचलुन ते घेऊन जातात. हे महत्वाच. प्रत्येक दिवस ३ लिटर देता त्यांना आणि त्या तिन लिटर मधुनच कचरा उचलला जातो. याच्याकडे सुध्दा लक्ष दिला पाहिजे. आपल्या विहिकल्स त्यांना दिलेले आहे. जर उद्या परवा वॉटरग्रेसचा ठराव रद्द झाला. यथा कदाचित त्रुटीने काही प्रॉब्लेम आले. हे चांगले नवे विहिकल्स दिलेले. आता किती महिने झाले त्यांना उपायुक्त साहेब गाडया देऊन.

**मा.उपायुक्त,** (आरोग्य) :- साढेतीन महिने झालेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** साढेतीन महिने झाले आहेत . त्यांची सर्विसींग किती महिन्यात करावी लागेल असे काही आहे का किती महिन्यात करावी. आपल्या मनपाची गाडी असली तर आपण सर्विसींग किती दिवसात करतो.

**श्री. लासुरे (वाहन विभाग):-** आपण त्यांचा एक काळ ठरविलेला आहे तीन महिने , सहा महिने , नऊ महिने , बारा महिने या प्रमाणे किंवा किलामीटर प्रमाणे , किलोमिटर प्रमाणे सर्विसींग करणे आवश्यक आहे. असे ऑप्शन आहेत परंतु आपण जो ठेका दिला आहे त्या गाडयांचे सर्व काम मक्तेदार करत आहे.आणि त्यामुळे वाहन विभागाचं त्या वाहनांवर कोणत्याही प्रकारचं नियत्रंण नाही .

**श्री.विष्णु भंगाळे :-** हा महत्वाचा मुद्दा आहे की तिन साढेतिन महिन्यामध्ये आपली गाडी सर्विसींग झालीच पाहीजे होती , आता मला याचं एक उत्तर द्या . मागील काळामध्ये आपल्या दोन गाडयांचे ॲक्सीडेंट झाले त्याची आजच्या तारखेला काय पोझीशन आहे.

**मा.सभापती :-** विष्णु भाऊंनी असे विचारले आहे की मागे दोन गाडयांचा ॲक्सीडेंट झालेला आहे. त्यांची आज काय परिस्थिती आहे.

**श्री. लासुरे (वाहन विभाग):-** ॲक्सीडेंट वाहनांचा त्या संदर्भात त्या वाहनांची रजिस्ट्रेशन ची प्रत व ड्रायव्हर लायसन्स ची प्रत आपण मक्तेदाराकडुन मागीतली असता अद्याप पावेतो त्यांनी त्याची पुर्तता केलेली नाहीये.त्यांचे जे सुपरवायझर आहेत

त्यांना वारंवार सचनाही दिल्या आहेत तसेच पत्रही पाठविलेले आहे. त्यात त्यांना सांगण्यात आलेलं आहे की तात्काळ पुर्तता करावी. आणि बाकी जे आहे महापालिकेची पुर्तता केलेली आहे. वाहनाचा इंन्शुरन्स व वाहनाचे फीटनेस सर्टीफीकेट आणि मक्तेदाराने ते दिल्यानंतर आपण कंपनीला रवाना केल्यावर इंन्शुरन्स कंपनी क्लेम देईल आपल्याला त्याचा.

**मा.सभापती :-** म्हणजे मक्तेदाराने कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही.

**श्री. लासुरे (वाहन विभाग):-** हो

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभागृहाला सांगा हे .

**श्री. लासुरे (वाहन विभाग):-** त्यांचे जे सुपरवायझर आहेत मक्तेदाराचे त्यांना वारंवार समक्ष बोलावुन मी सांगीतले आहे की वाहनाचा ॲक्सीडेंट झालेला आहे तुम्ही त्या करीता कागदपत्रांची पुर्तता करावी. जेणेकरून पुढील कार्यवाही करता येईल.परंतु ते म्हणतात की जो वाहन चालक आहे. म्हणजे जो वाहन चालक होता तो वाहन चालक काम सोडुन गेलेला आहे त्यामुळे ते लायसन्स देत नाहीत. असं त्यांच म्हणणं आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मग ही जबाबदारी कोणाची

**मा.सभापती :-** त्यांनी जे कागदपत्र आपल्याकडे सबमिट करायचे आहेत त्याची लेखी सुचना मनपा मार्फत दिल्या गेली का. कसली वाटत बघत आहे आपण ? आपण त्यांना तोंडी चार वेळा सांगीतले आहे, उपायुक्त साहेबांना ही सुचना आहे की, याची सगळया गोष्टींची नोंद घेण्यात यावी.

**उपायुक्त , (आरोग्य):-** याच्यामध्ये काय आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, याच्यामध्ये ठेक्याची जबाबदारी नाही का ? आता मला एक सांगा, गाडीचा ॲक्सीडेंट किती महिन्या आधी झाला. महिने म्हणतो मी दिवस नाही विचारत. त्याची कार्यवाही आजपर्यंत कागदावर काय आहे. त्याच सभागृहाला आपण उत्तर द्याव.

**उपायुक्त , (आरोग्य):-** याच्यामध्ये कारण काय आहे की वाहन विभागाकडे दोनच कर्मचारी आहेत . हे मी वारंवार तपासलं बऱ्याचशा फाईली माझ्या परस्पर पुढे पुटअप केलेल्या आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** सर अग्निशमनचं हे आहे ना कईक वर्ष झालं चालु आहे.

**उपायुक्त , (आरोग्य):-** नाही दुसरा विषय अग्निशमनच्या गाडयांचं उत्तर मी देतो.

**श्री.नितीन बरडे :-** हया अग्निशमनच्या गाडयाच नाही किती खर्च केला आहे की काही गाडया सडताहेत.

**उपायुक्त , (आरोग्य):-** नाही आता काय आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय कालांतराने या गाडया चालण्या लायक राहणार नाहीत. अशी परिस्थिती जर येथे राहणार आहे हे आम्ही सभागृहाच्या निदर्शनास आणुन देतो आहे. आणि एक सांगावसं सुध्दा वाटत मॅडम जर पंक्चर झाली ठेकेदारास दिलेली गाडी तर पंक्चरला सुध्दा ठेकेदार पैसे देत नाही.त्या ड्रायव्हरने जर पंक्चर टाकण्याचे पैसे टाकलेत ना त्याला आतापर्यंत पैसे दिलेले नाहीत.

**मा.सभापती :-** उपायुक्त साहेब ह्या गोष्टीची नोंद घ्यावी. आणि आता या परिस्थिती वरून याचं गांभीर्य लक्षात येतय की विष्णु भाऊंनी जे सांगीतलेलं आहे त्या सगळया गोष्टी की मॅकेनिकल इंजिनियरची पोस्ट आवश्यक आहे. त्या विभागाला सक्षम अधिकारी नसल्यामुळे ह्या सगळया गोष्टी होताहेत.आणि आता मला वाटतं यापुर्वी ही या सगळया गोष्टी सभागृहापुढे चर्चेला येवुन गेलेल्या आहेत. प्रशासनाने ईथे याची नोंद घ्यावी. यादृष्टीने पुढील कार्यवाही करावी.

**श्री.नितीन बरडे :-** सभापती साहेब दोन टँकर दुरूस्ती करण्याचा विषय होता आरोग्याधिकाऱ्यांनाच माहित नव्हतं त्यांना विचारा की ते टँकर तरी दुरूस्त झाला का.

**आरोग्याधिकारी , डॉ.विकास पाटील :-** हा विषय झाला होता .

**श्री.नितीन बरडे :-** खुप दिवस झाले बंद आहे.

**उपायुक्त , (आरोग्य):-** याच्यात काय आहे वाहन विभागाचे जे काही दोन कर्मचारी आहेत. एवढी अवस्था आहे त्यांची बरेचशे प्रकरण पेंडींग आहेत. त्यांच्या विभागाचे मी आता मागच्या तिन महिन्यात तीन मिटींगा घेतलेल्या आहेत. वाहनं जुनी असतील त्यांचा लिलाव प्रक्रीया असेल , जुन्या वाहनांच रजिष्ट्रेशन कॅन्सल करणे असेल.आणि जी काही पेडींग वाहन लिलाव आहे. त्याचं व्हल्युएशन असेल आणि त्याची जी काही लिलाव प्रक्रीया असेल. ज्यांची लिलाव प्रक्रीया झाली त्याचं रजिष्ट्रेशन कॅन्सल करायचे असेल.जुनी जी वाहनं आहेत त्यात रोड रोलर आहे , जेसीबी आहे. अजुन काही डंपर सुध्दा होते त्याच्यानंतर ४०७ व्हेईकल होते याबाबत या विभागास वारंवार सुचना देवुनही त्यांच्याकडुन ही प्रक्रीया गतीने आणि फारशी होत नाही .ट्रक्टर रोडर साढेतिन महिने तो त्या शोरूम ला पडुन होता तो मी सांगीतल्यानंतर चौथ्या दिवशी दुरूस्ती होवुन ईथं आला.साढेतिन महिने नुस्ता पडुन होता . जेसीबी व्हेईकलच्या बाबत खुप पाठपुरावा करून सुध्दा आता १२ ला टेंडर ओपन होणार होतं. पण १२ नंतर मधला जो पिरीयेड गेला साधारणत: १५ दिवसांचा तो मधला पिरियेड मध्ये त्यांनी कोणतीही गोष्ट विभाग प्रमुखांना ही नाही आणि माझ्यापर्यंतही नाही आली .मी वारंवार त्याना दोन दोन दिवसांनतर त्यांना रिमांईडर देत आलोले आहे. मागच्या ३० तारखेला आम्ही प्रशासन विभागाकडे ती ताब्यात दिलेली आहे. ह्या कर्मचाऱ्यांचे ऐवजी पर्यायी कर्मचारी द्यावेत. म्हणजे समकक्ष जे काही एज्युकेशन आहे ते . आणि फायरच्या गाडयांच्या जो विषय आहे त्यात आचारसंहितेच्या प्रक्रीयेमध्ये खुप फार फास्ट प्रक्रीया करून आम्ही दोन्ही विषय मार्गी लावलेले आहेत. एक विषय पत्र

जनरल बॉडीला सादर झालेले आहे . मला वाटतं दोन महिन्यापुर्वीचं आहे पण आचारसंहितामुळे तो होवु शकला नाही .नगरसचिवांच्या मी नेहमी संपर्कात आहे फक्त त्या विषयासाठी तो विषय जीबी ला मंजुर झाल्यानंतर आम्ही लवकर त्या गाडयांची बॉडीची बांधणी करू.आणि मार्च अखेर त्याच्या आधी त्या गाडयांच रजिष्ट्रेशन होणं गरजेचं आहे. नाही झालं तर त्या गाडयांची व्हॅल्यु झिरो होवुन जाणार आहे. म्हणुन आमचा पाठपुरवा आहे. फायर च्या बाबतसुध्दा आता ४ तारेखेला टेंडर ओपन झाल्यानंतर त्यांनी निव्वळ टाईमपास केलेला आहे हे मी त्यांना सकाळीस सांगीतले आहे.आता काल मी त्यांच्या मिलींद चौधरी म्हणुन आहे. ते कामात चांगल्या प्रकारे तत्पर आहे त्यांना मी काल दोन काम दिले होते त्यांनी दोन्ही प्रकरण खुप चांगल्या पध्दतीने मार्गी लावलेले आहेत. मागच्या काही फाईल त्यांनी सोनवणी साहेबांकडे ठेवली असेल. अगदी त्रुटी फाईल अपुर्ण फाईल कोणतीही पुर्तता न केलेली फाईल अशी असतांना विभाग प्रमुखांनी सही करणे अडचणीचा आहे. काल मिलींद चौधरींनी ती प्रक्रिया बऱ्यापैकी मार्गी लावलेली आहे. त्यांचे डॅक्युमेंटस येणे आपेक्षित आहे. ज्यांचे येतील त्यांच्याबाबत आपण पुढे जाऊ या. ज्यांचे नाही येतील त्यांना आपण विषय कॅन्सल करु. परंतु पुढच्या सभेला आम्ही तो विषय नक्की ठेवु जो काही प्रस्ताव आलेला आहे त्याप्रमाणे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.सभापती, मी उपायुक्त साहेब, आरोग्य यांना विचारु इच्छितो, १५ दिवसापासुन मी दोन पत्र दिलेले आहे माहिती मिळण्यासाठी. ती माहिती मला १५ दिवसात का मिळाली नाही. अशी काय अडचण आहे की ती माहिती आपण देऊ शकत नाही. काहींना तुम्ही २७-२८ दिवसाने तर काहींना दुसऱ्या दिवशी दिलेली आहे. अस हे पत्रात काय आहे की आपण माहिती दिलेली नाही.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** दुपारी पुर्ण कागदपत्र होऊन जातील.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आज स्टँडींग नाही राहीली असती तर माहिती आली नसतील.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** झेरॉक्स खुप आहे आणि काल झेरॉक्स मशिन बंद होती. १० व्या मजल्यावरची.

**श्री. नितीन बरडे :-** आम्हाला सांगितल असत. मी पैशे दिले असते.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** तुमच काम होऊन जाईल आज.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आमच्या सदस्यांनी डिपार्टमेंटसला कागद सुध्दा मागुन दिलेले आहे. फक्त तुम्ही सांगा हो. तुम्ही सांगितल्यानंतर आम्ही केल नाही अस कधी घडल आहे का ?

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** मी संपुर्ण माहिती घेऊन तयारी केलेली आहे दुपारी तुम्हाला मिळुन जाईल १००%.

**मा.सभापती :-** जर आपली १७ मजली मध्ये काही समस्या आली तर त्यासाठी आपल्याकडे काय व्यवस्था आहे.

**श्री.योगेश बोरोले :-** वरती ओरीएंट टँक आहे आपली. ती कायम भरलेली असते आणि अग्निशमनसाठी एक सेपरेट पाईप लाईन आहे.

**मा.सभापती :-** ते सगळ कार्यानवित होऊ शकेल अश्या अवस्थेत आहे का ?

**श्री.शशिकांत बारी, अग्निशमन विभाग :-** दर दिड महिन्यात आम्ही चेक करत असतो.

**मा.सभापती :-** जर ११ व्या १२ व्या मजल्यापासुन जर अशी गटना घडली तर त्याच ताबडतोब आपण आपल्या लेव्हलवर कंटोल मिळावु शकु ऐवढी व्यवस्था आहे.

**श्री.शशिकांत बारी, अग्निशमन विभाग :-** नक्की कारण ती सिस्टीम आम्ही प्रत्येक ३ महिन्यात चेक करुन घेतो.

**श्री.दिलीप पोकळे :-** आता यांनी अशी माहिती दिली की, दिड कोटी रकमेची वाहने बंद आहे. जर मार्च अखेर त्या वाहनांच रजिष्ट्रेशन होत नाही. तर आपले ते दिड कोटी झिरो होणार आहे. सभागृहाला तो विषय आलेला आहे. पेपरला ही तो विषय आलेला आहे. दिड कोटीचे वाहने दोन वर्षापासुन पडुन. माझी सभागृहाला विनंती आहे की, दोन वर्षापासुन जे काम झालेला नाही. तर हे ३ महिन्यामध्ये पुर्ण करतील का ही शंका आहे. यांनी जर काम पुर्ण केल नाही आणि महानगरपालिकेच जर दिड कोटीच नुकसान झालं. तर ती जबाबदारी अधिकाऱ्यांची. आणि ती नुकसानाची रक्कम अधिकाऱ्यांकडुन व्याजासहीत वसुल करण्यात यावी अशी माझी मागणी आणि विनंती आहे.

**मा.सभापती :-** दिड कोटीची वाहन पडुन असण आणि ही बाब मिडीया कडुन समोर येणे आणि सदस्यांना या विषयावर वारंवार बोलावं लागत आहे. ही चांगली गोष्ट नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदया, मॅकॅनिकल इंजिनिअर मिळेल या दृष्टीने आपण प्रयत्न कराव.

**मा.सभापती :-** उपायुक्तांनी तशी टिप्पणी ठेवलली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** एक मला सांगाव अस वाटत सभापती महोदया, या विभागाचा इंजिनिअर त्या विभागाचा इंजिनिअर पुन्हा मॅकॅनिकलला दिला जाईल. शेवटी सिव्हील इंजिनिअर असेल तो मॅकॅनिकल इंजिनिअर इतक लक्ष देऊ शकत नाही. आपण ईतक्या गोष्टी गाडयांच्या बाबतीत करतोय तर मग गाडयांच्या बाबतीत होणारं नुकसान सुध्दा याच्याकडे आपण लक्ष वेधल पाहीजे . त्या माध्यमातुन ११ महिन्याच्या कॉन्ट्रक्टवर का असेना , आयुक्त साहेब असतील , महापौर असतील व सभापती यांच्या मार्गदर्शना खाली ती पोस्ट जर आपण भरली तर नक्कीच आपल्याला पुढील काळामध्ये नविन काहीतरी दिशा मिळेल.अध्यक्ष महोदय आणि जो काम करतो आपण त्याच्याच कडे दोन दोन चार्ज जर दिलेना तर धड एका गोष्टीकडे लक्ष देता येत नाही. असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

**मा.उपायुक्त (सा.प्र) :-** मा.सभपती व सन्मा.सदस्य याच्याबाबतीत आयुक्त साहेबांशी चर्चा झालेली आहे.तर पुढच्या आठवडयात टेंडर काढतोय तर आपण मानधनावर घेतोय पर्यावरण साठी पण घेतोय आणि वाहन विभागासाठी पण घेतोय .

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपल्याला मागे पर्यावरण साठी वृक्ष लागवडीसाठी तसे आपण वृक्ष लावतो कुठेही लावतो त्या माध्यमातुन म्हणतोय . माझी सभागृहाला पुन्हा एक विनंती आहे. मागच्या मिटींगला सुध्दा आयुक्त साहेब नव्हते आजच्या मिटींगला सुध्दा आयुक्त साहेब नाहीयेत . जर काही ठाराविक काही विषय असले तर त्या माध्यमातुन उपायुक्त साहेबांना असे वाटते की आयुक्त साहेबांना ते विषयी विचारून त्या कामाची दिशा ठरवु तर उपायुक्त साहेब माझी विनंती आहे आपल्याला जर येतांना ते अधिकर दिले तर येतांनाच घेवुन यायचे की सभागृहाने आम्हाला जे अधिकार दिले आहेत तर मी तेथेच निर्णय घेवुन टाकेल तर माझी पुन्हा विनंती आहे की येतांना कमीत कमी आयुक्त साहेब नसले तर ते अधिकार आपण नक्की घेवुन यावे हि विनंती आहे सभागृहाला.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** दोन दिवसापासुन सभापती महोदय व्हॅक्युम कार पंक्चर आहे , पंक्चर काढण्यासाठी दोन दिवस लागतात .आमच्या वॉर्डात सार्वजनिक शौचालयामध्ये टँक साफ करण्याच्या दृष्टीने आमच्या त्या एस.आय ला सांगीतले आहे आज सकाळी मी परत घेवुन आलो होतो . तर अशा बारीक सारीक गोष्टी आहेत . तर आपले वाहन दोन दिवस झाले पंक्चर आहे ते अजुन जोडले जात नाही. काय प्रकार आहे . आहेत ना ते साहेबांना ऐवढेही जमत नाही का समजा आपल्या त्या क्षेत्रातला इंजिनियर नसेल किंवा डिप्लोमा धारक नसेल तर हया छोटया छोटया गोष्टी केल्या पाहीजे प्रशासनाने बारकाईने लक्ष दिलं पाहीजे. असे केलं पाहीजे. आहे का ते येथे आहे का पंक्चर आहे का चांगली आहे .

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** गाडी आज चालु होईल.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** कधी होईल .

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** गाडी आज चालु होईल .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** काय झालं होतं तिला

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** दोन टायर पंक्चर होते ती आज सुरू होईल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०१/०७/२०१९ ते दि.०७/०७/२०१९, दि.०८/०७/२०१९ ते दि.१४/०७/२०१९, दि.१५/०७/२०१९ ते दि.२१/०७/२०१९, दि.२२/०७/२०१९ ते दि.२८/०७/२०१९, दि.२९/०७/२०१९ ते दि.१८/०८/२०१९, दि.१९/०८/२०१९ ते दि.२५/०८/२०१९, दि.२६/०८/२०१९ ते दि.०८/०९/२०१९, दि.०९/०९/२०१९ ते दि.१५/०९/२०१९, दि.१६/०९/२०१९ ते दि.२२/०९/२०१९ व दि.२३/०९/२०१९ ते दि.२९/०९/२०१९ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**अनुमोदक :-काळे रेश्मा कुंदन**

**नगरसचिव:- विषय क्र. ७)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./७९ दि.२२/११/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील जळगांव शहर मधील खोटे नगर चौक, मानराज पार्क चौक, इच्छादेवी चौक, कालिकामाता चौक, नेरी नाका येथील ट्रॅव्हल स्टॅण्ड, सिंधी कॉलनी चौक, प्रभाग चौक, काशिनाथ लॉज चौक, चौबे मार्केट चौक, पिंप्राळा स्मशानभुमी येथील महानगरपालिका मालकीच्या जागेवर सार्वजनिक वापराकरीता एकूण १०० नग (सिमेंट बाकडे) बेचेंस बसविणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१०,८६,०००/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**श्री.नितीन बरडे :-** हे कोणते बाकडे आहे असे की दहा हजार आहे.

**श्री. शहर अभियंता ,सुनिल भोळे :-** नाही भाऊ १० लाख आहे.

**श्री.नितीन बरडे :-** हो १० लाख ८६ हजाराचे सिमेंट चे बाकडे आहेत का .

**श्री. शहर अभियंता ,सुनिल भोळे :-** वेगवेगळया ठिकाणी आहेत.

**श्री.नितीन बरडे :-** वेगवेगळया ठिकाणी आहेत पण १०० नग आहेत ना. १० हजारांचा असा कोणता बाकडा आहे सिमेंटचा

**श्री. शहर अभियंता ,सुनिल भोळे :-** सिमेंट कॉंक्रीट ने बनविलेले बाक आहेत एका बाकाची किमंत जवळपास ९,७००/- रू आहे. आणि आपण १०० बँचेस ची मागणी केलेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सिमेंटचे बाकडे असे कोणते आहेत. भाऊंच्या उद्यानात जे बाकडे बसविले आहेत ना तो ७०००/- रू. चा आहे तो मी इंदौर वरुन आणलेला आहे.

**श्री. शहर अभियंता ,सुनिल भोळे :-** भाऊ हे मार्केट रेट आहे ,आपण मागे दिले होते .

**श्री.नितीन बरडे :-** हो पण सिमेंटचा आहे असा कोणता आहे ९७००/- रूपयाचा का याच्यामध्ये कमाई चं साधन आहे.

**श्री. शहर अभियंता ,सुनिल भोळे :-** नाही भाऊ तसे नाहीये. मार्केट रेट नुसार आपण ते खरेदी करणार आहोत.

**श्री.नितीन बरडे :-** याच्या पेक्षा चांगले बाक आहेत भाऊंच्या उद्यानात सर्वांनी बधितले असतील.आम्हाला काही भेटतील का याचे.

**श्री. शहर अभियंता ,सुनिल भोळे :-** भाऊ बाक चांगल्या क्वालीटीचे आहेत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चांगले आले तर आम्ही सत्कार पण करू तुमचा तसा काही विषय नाहीये.

२ . प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./८० दि.२२/११/२०१९ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचेकडुन खरेदी करणे कामी रक्कम रु.१०,९५,३६०/- + रक्कम रु.१,१३,०५०/- असा एकुण रक्कम रु.१२,०८,४१०/- मात्र खर्चाची संविदा.

**श्री. चेतन सनकत :-** माहिती घेतली.

**श्री.दिलीप पोकळे :-** एकदा चेक करुन घ्या साहेब.

**मा.सभापती :-** सन्मा.सदस्यांनी ज्या समस्या मांडलेल्या आहेत त्यांच आठ दिवसात निराकरण करा. काय केलेल आहे त्याच आढावा घ्या. आता एक एक सदस्य विषय घेणार आणि विभाग प्रमुखांनी आढावा द्यायच आहे.

**श्री. नितीन बरडे :-** आरोग्य विभाग कोणाकडे आहे प्लास्टीक बंदी.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** प्लास्टीक बंदीसाठी पथकाची नेमणुक केलेली आहे आपण.

**श्री. नितीन बरडे :-** मी अधिकाऱ्यांना सुचित करु इच्छितो, साहेब याच्यावरची कार्यवाही पुर्णपणे बंद पडलेली आहे. आपण काही पहले कॅरीबॅगस जमा केल्या होत्या. किती जमा केल्या होत्या याच वजनपण तुमच्याकडे आहे. किती विकल्या गेल्या याचंपण वजन आहे. चेक करुन घ्या. ही कार्यवाही पुर्णपणे बंद पडलेली आहे. हप्ते वसुली चालु झालेली आहे. मी अधिकाऱ्यांना सुचित करु इच्छितो, आपल्या स्तरावर चेक करावे आणि हे बंद करावे. मी फक्त सुचना मांडत आहे. मी कोणावर आरोप करत नाही. मी फक्त सुचित करत आहे. कारण की मी अनुभवलेल आहे. किती जमा झाल्या किती विकल्या गेल्या. परस्पर किती बाहेर विकल्या गेल्या. रिटर्न किती गेल्या. हे तुम्ही पुर्ण चेक करुन घ्या.

**उपायुक्त , (आरोग्य):-** वॉर्ड वाईज डेली मी रिर्पोटींग घेत आहे . माझ्याकडे मागच्या आठवडयात जी कंप्लेंट आली की या ठिकाणी मोठया प्रमाणात वेळोवेळी कुठुनतरी सप्लाय होत आहे. त्याची सुध्दा मी दर आठवडयाला म्हणजे मी स्वत: तिथं मी कॉन्टॅक्ट नंबर घेवुन ठेवलेला आहे. मॅसेज येईल त्यावेळेला आमचं मोठ पथक आठ ते दहा लोकांचं पथक त्या ठिकाणी कारवाईला राहील . प्रत्येक वॉर्ड निहाय मागच्या तिन दिवसापासुन मी रोज कारवाई करायला सांगीतलेले आहे.आणि त्यांचे रोजचे रिपोर्ट माझ्याकडे येतात.

**श्री. नितीन बरडे :-** आपण तपास करा वसुली चालु झालेली आहे.

**उपायुक्त , (आरोग्य):-** याची मी गांभीर्याने दखल घेतो .असं जर कुठे आढळलं तर

**श्री. नितीन बरडे :-** आपल्याकडे जेवढया पिशव्या जमा झाल्या होत्या , त्याच्यातुन किती आपण विकल्या किती डिस्पोज केल्या आणि तिथुन किती रिटर्न गेल्या बाजारात याचाही तपास घ्या.

**उपायुक्त , (आरोग्य) :-** त्या अनुषंगाने मी या बाबतचा आरोग्याधिकारी यांच्या कडुन सर्वत्र लेखी तपशिल मागवलेला आहे. आणि आम्ही याची विल्हेवाट लावण्यासाठी पोल्युशन कंट्रोल बोर्डाचं गाईडलाईन घेतलं होतं. त्या प्रमाणे आम्ही आदेशही दिले होते. परंतु मागच्या आठवडयात मला जी काही सुचना प्राप्त झाली त्याप्रमाणे मी त्यांच्याकडुन लेखी मागीतलेलं आहे. तो रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर मी पुढच्या मिटींगमध्ये ते सभागृहापुढे ठेवेल आणि त्याच्यावरही त्याच्यात काही अनियमीतता झाली आहे असे लक्षात आले तर आमचे जे संबंधित कर्मचाऱ्यांवर नक्की कारवाई होईल.

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्य श्री.प्रविण रामदास कोल्हे यांचा रजेचा अर्ज आलेला आहे तो सभापती महोदया यांनी मंजुर केलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सभापती महोदय ,मागच्या मिटींगमध्ये नगरसेवक डायरी सुरू करणेबाबत विषय झाला होता त्याचे काय.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** भांडार विभागाकडुन प्रुफ आले होते ते चेक करून आम्ही बाळु भामरे यांच्याकडे दिले आहे. तर त्यांनी सांगीतले की आज दुपार पर्यंत डायऱ्या येवुन जातील.

**मा.सभापती :-** आज येतील तरी आज सगळया नगरसेवकांना दिल्या जातील का .

**भांडारपाल , दिनानाथ भामरे :-** आज दुपारी माझ्याकडे आले की लगेच आरोग्याधिकारी यांचेकडे देईल.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** भांडार विभागाकडुन आल्या की लगेच आम्ही वाटप करून देवु.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय, ज्या नगरसेवकांकडे जुन्या डायऱ्या आहेत त्या चालु करू शकतो त्या का करू शकलो नाही आपण काही दिवसांचा आठ दिवसांचा फॉलोप त्याच्यावर झाला असता ना.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** भाऊ डायऱ्या काहींकडे नाहीत , म्हणुन आपण नविन छापल्या आज दुपार पावेतो आल्या की देवु लेगच.

**श्री. नितीन बरडे :-** आज दुपारी तुमची ही डायरी यायला पाहीजे , आणि बांधकाम विभागात आता एक युनिअ आहे पाच सहा वॉर्ड आहेत किती आहेत पाच सहा वार्ड आहे ना तुम्हाला जोडलेले . ट्रक्टर आम्हाला फीरावं लागतं मागणी करता तर आम्हाला तीही डायरी ठेवण्यात यावी की आज आम्हाला की आज हया वॉर्डात उदया त्या वॉर्डात म्हणजे इंजिनियर म्हणार नाही की तुमच्याकडेच होतं आम्ही डायरी वरुन दाखवु की ट्रक्टर किती दिवस नव्हते आणि किती दिवस होते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , आता दुसरा विषय

**भांडारपाल , दिनानाथ भामरे :-** आपल्याकडे आलेले आहेत सोलापुर वरुन आता ते ओपन करायचे आहे उद्या

**मा.सभापती :-** केव्हा होतील

**भांडारपाल , दिनानाथ भामरे :-** उद्या

**मा.सभापती :-** उद्या

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तिसरा मुद्दा झेडींग मशीन चे काय झाले.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** त्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

**मा.सभापती :-** पुढच्या स्थायीमध्ये ते यायला पाहीजे येथे म्हणजे ते मंजुर होवुन जाईल.

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** हो मॅडम.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ग्रिल मशीन पण घ्या त्याच्यात

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** ग्रिल मशीनची मागणी वेगळी द्यावी लागली कारण तो विषय वेगळा आहे पाणी जे थांबत आणि जात नाही काही ठिकाणी लाकडाच्या फळया असतात त्या अडचणीच्या असतात त्या आम्हाला काढण्या सोपं नाही त्यामुळे ते वेगळे घ्यावे लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्याच्यानंतर आपल्या शौचालयाचा विषय सांगीतला होता मी

**आरोग्यधिकारी , डॉ.विकास पाटील:-** आज घेतल्या त्या आल्या की आपण ----------------- आणि जागा दाखवा आपण सुरू करून देवु

**मा.सभापती :-** डॉ. साहेब तातडीने ताबडतोब हा विषय मार्गी लावा कारण की मागच्या मिटींग मध्ये हे सांगीतलं होतं तर ते आतापर्यंत व्हायला हवं होतं मागे हा विषय झाला होता की आज आपण जाऊ या आइ दिवसांत तुमचं जावुन यायला हवं होतं आता आजच्या आज तो विषय मार्गी लावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता हा एक विषय आहे उड्डाण पुलाचा म्हणजे आमचे नातु पंतु कटतील तेव्हा हा विषय होणार आहे का .

**मा.सभापती :-** या विषयी सन्मा. सदस्यांनी अतिशय चांगला एक पर्याय सुचवलेला आहे . ब्राम्हण सभेकडुनचा जो बोगदा आहे. तर मला वाटतं तो प्रक्टीकली व्हिजीबल नाही असं आपल्याला रेल्वेकडुन कळविण्यात आलेलं आहे , तर त्या विषयावर पण आपला अभ्यास अजुन सुरू आहे पण त्या ठिकाणी नवनाथ भाऊ यांनी ईथे एक विषय सुचवलेला होता कि ख्रिस्ती कब्रसतान ते देवकर निवास पर्यंत असा आपण स्काय वॉक करावा त्या बद्दल माझं प्रशासनाशी बोलण झालेलं आहे. नवनाथ दारकुंडे त्या दिवशी हजरही होते तर तो विषय आपल्याला पुर्ण मार्गी लावायचा आहे. रेल्वे प्रशासनासोबत आपण लवकरात लवकर चर्चा करून हा फ्लाय ओव्हर जर आपण बनवुन घेतला तर आपल्याला भविष्यासाठी कायम स्वरूपी उपाय असणार आहे. या समस्येवर आणि हा विषय नवनाथ भाऊंनी खुप म्हणजे खुपच आधी पासुन लावुन धरलेला आहे.हा पर्याय जो त्यांनी सुचवलेला होता हा सुध्दा त्यांनी सुरूवातीपासुन सुचविलेला होता. तर आता माझी सुचना आहे प्रशासनातील अधिकाऱ्यांना की या विषयासंदर्भात आपले सहकार्य व सखोल कार्यवाही अपेक्षित आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तिकडे पुल होऊ शकतो का, उस्मानिया पार्कच्या लाईनीला.

**प्रकल्प अभियंता,श्री.बोरोले :-** हो होऊ शकतो, आणि आपण तसा प्रपोजल ही दिला. त्याची कॉपी मॅडमांना दिलेली आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** तो महादेव मंदिराकडे जो मार्ग जातो त्या ठिकाणी मोठे मोठे पाईप टाकुन चार महिने झाले. लोकांना जाण्या येण्याला अडचण होते . आज माझ्याकडे २५ ते ३० लोकांचं एक शिष्टमंडळ आलं होम पण ते कसं आहे आता त्याला कुठेतरी हलवा ना मागच्या वेळेला पण बोललो होतो आजपर्यंत त्याचं काही हे नाही दुसरं असं की आपल्या मेहरूण तलावाच्या संदर्भामध्ये त्याचं मच्छीपालनाचं टेंडर निघालं पाहीजे आता त्याला १५ वर्षापासुन स्टे आहे तर त्या संदर्भामध्ये काय झालं हा एक विषय आहे.मागच्या मिटींग मध्ये मी हा विषय काढला होता . तर कुइ`तरी विषय मार्गी लागण आवश्यक आहे. अस मला वाटतं , मेहरूण तलावाचं टेंडर निघालं तर आपला फायदाही होईल . त्या ठिकाणी ज्या आत्महत्या होतात त्याही बंद होतील असे मागेही बोललो होतो व आताही बोलतोय.

**मा.सभापती :-** मागील सभेमध्ये हा मुद्दा उपस्थित झाला होता त्याचा अहवाल अद्याप पावेतो प्रशासनाकडुन आलेला नाहीये.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** न्यायालयाचा स्टे आहे असं म्हटंल जातं होत तेव्हा पासुन .

**शहर अभियंता, सुनिल भोळे :-** मागे आपण कार्यवाही केलेली होती त्यावर

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही आपण २००३ ला सुरू केले होते त्याचं काय झालं.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता जो पावसाळा झालाय असाच पावासाळा पुर्वी त्याच्यानंतर आणि माझे मासे वाहुन गेले म्हणुन मला परत ३ वर्षांची संधी देण्यात यावी असे त्याने अशा प्रकारची बाजु न्यायालयामध्ये मांडुन त्याने स्टे घेतला होता .आणि १५ वर्षापासुन स्टे आहे त्याच्यावर .

**अधिक्षक, किरकोळ वसुली, श्री.नरेंद्र चौधरी :-** आपण अगोदर नोटीस पण दिली होती . त्याच्यानंतर येथील निकाल लागण्यापुर्वी त्यांनी औरंगाबाद हायकोर्टात अपील दाखल केले आहे आणि त्याच्यावर स्टे आहे अजुनपर्यंत

**श्री.सदाशिव ढेकळे :-** १५ वर्षापासुन स्टे आहे आपले हे काय करतात .

**मा.सभापती :-** पुढील सभेपर्यंत या विषयाची पुर्ण माहिती मिळाली पाहीजे आणि फक्त सभापती म्हणुन नाही तर विधी समिती सभापती म्हणुन या विषयाचे सर्व स्वरूप ताबडतोब मला कळविण्यात यावं.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** पाईपांच काय

**प्रकल्प अभियंता,श्री.बोरोले :-** सोमवार पावेतो होईल.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** होईल का खरच हे पहा सभेच्या समोर सांगाताहेत तुम्ही.

**प्रकल्प अभियंता,श्री.बोरोले :-** हो हो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही तर लोक उचलुन घेऊन जातील.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** नाही. मोठे पाईप आहे ते.

**प्रकल्प अभियंता,श्री.बोरोले :-** रिकाम्या जागी टाकायला सांगितले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** ज्या अडचणी नितीन भाऊंनी बोलुन दाखविली. त्याचा ही आपण खुलासा करुन घ्यावा. की शासकीय येच्यात जात का ते. उद्या उठुन अस ना व्हावा की, आपण पुर्तता करावी त्यासाठी प्रशासनाला विनंती आहे. शासन जर ते देत असेल तर शासनाच्या माध्यमातुन का असे ना.त्याची प्रोसीजर करावी. अशी प्रशासनाला विनंती आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जेव्हा विष्णु भाऊ तुम्ही महापौर होते. तेव्हा मक्तेदार मच्छी पालन करत होता. त्यावेळेला पुल आला त्याच्या मच्छया वाहुन गेल्या. त्या माणसाने आपल्या नगरपालिकेवर केस केली. मला भरुन मिळाव त्या मासयांच खर्च. भाऊच्या वेळेचा विषय आहे. तो.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.सभापती महोदया, एस.एम.आय.टी. कॉलेजचा जो बोगदा आहे त्याच्या पुढे जी गटार केलेली आहे त्याच सपाटीकरण आणि त्याच लेवल केल का?

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- लेव्हल करणे संदर्भात त्यांनी ती चालु केलेली आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** इतिवृत्तात सुध्दा आहे तो विषय. मागील वेळेस आपल्या महानगरपालिकेच्या मागील बाजुला चेंबर आहे काही ओपन त्याच्या वरती चर्चा झाली होती. त्या चेंबरवर ढापे बसले होते.

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- त्याचे इस्टीमेट तयार केलेले आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अंदाजपत्रक तयार केलेल आहे. परंतु कोणी व्यक्ती पडला काही घटना घडली तर ते महागात पडणार आहे आपल्याला. दिसणार नाही साहेब एक माणुस जर खाली गेला तर.

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- लवकरात लवकर चालु करण्याच प्रयत्न करतो.

**मा.सभापती :-** जी बिल्डींग आहे आपली त्याच्या वरच्या मजल्यांवर जी डक्ट आहे. त्याच्या दरवाज्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. पुर्ण तुटुन गेलेली अवस्तेत आहे दरवाजे. तेथे सुध्दा अशी घटना घडु शकते भविष्यात.

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- कालच साहेबांशी बोलण झाल. ज्या ही ठिकाणी दरवाजे चांगल्या परिस्थिती मध्ये आहे. ते काही नागरीक आहे जे ते उघडुन ठेवतात. ओपन केल्याने काय होत. त्यातुन जे वास आहे तो येतो. ज्या ठिकाणी दरवाजे बंद आहे त्या ठिकाणी वास येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आर.आर.शाळेच्या चौकात मोठ मोठे लाल फरश्या ठेवुन दिलेले आहे तेथे, अक्षरशा इतक प्रॉब्लम येतो गाडयांना तिथे आणि इतके Emergency आणि रहदारीचे ठिकाण आहे. रोज मॅसेज टाकल्यानंतरही इतक प्रॉब्लम येतो. आमच्याकडे तर भोळे साहेब, महापौर आणि स्थायी समिती सभापतींचा अभिनंदन करतो की, आमच्याकडे देवमाणुस देऊन टाकल आहे जावळे साहेब. आता ही ते देवदेव करायला गेलेले आहे. आहे त्यांच काम चांगल पण देवाकडे थोड जास्त कल असल्यामुळे. खुप खुप प्रॉब्लम आहे तेथुन ते टर्न घेतांना तो ४ फुटाचा रस्त्याच्या माध्यमातुन नेहमी प्रॉब्लम येत असतात. मी आरोग्यचे डॉक्टर आणि महापालिकेचे प्रवक्ते यांना विचारु इच्छितो, त्यांना शाहुनगर परिसरात जे.सी.बी.च्या माध्यमातुन सांगितल होत. ते उचलल गेल. रविवार होता. कोणाच्या आदेशाने रविवार होत तर त्यांनी म्हटल होत की मी पुढच्या मिटींग पर्यंत उत्तर देतो. कस असत पार्टीचा प्रवक्ता एकदा बोलला की, ते जसाचा तसा चालत, ठामपणे बोलतात. आपली महापालिका आणि कॅरपोरेटरांनी जर विचारल, डॉक्टरांनी सांगितल की झालं.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** त्यांच्या आदेशानुसार काम झालं ते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** माती भरली त्यांनी ?

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** नाही, माती नाही कचरा भरला होता त्यांनी.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्याची क्लिप आहे. मातीचा पुर्ण भुगुल भरण्याची क्लिप आहे ती. तुम्ही असे उत्तरं नका देऊ. प्रुफ आहे आणि आम्ही आता प्रुफ ठेवुनच बोलत आहे. तेथे माती भरली गेलेली आहे. कचरा नाही भरला गेला.मग अस झाला की, त्या दिवशी त्या मातीचा वजन कचऱ्याचं दाखविल गेल आहे. म्हणजे मातीच वजन सुध्दा कचरा म्हणुन दाखविल आहे. तुमच संपर्क होत आहे का वॅाटरग्रेस वाल्याशी. खालील कर्मचारी जर कचरा म्हणुन त्याच वजन देत असेल तर नुकसान महापालिकेच आहे. ही बाब मी पुढच्या वेळेस म्हटलो होतो की, तुम्ही उत्तर आणा. मी मोबाईल क्लिप आपल्याला देतो. ती माती भरण्याची क्लिप आहे. आणि ते वजन करुन टाकल त्या गाडीला तर हे नुकसान महापालिकेच आहे. जबाबदारी कोणाची हे किती दिवस चालेल. म्हणजे शहराचा कचरा उचलायच नाही आणि माती भरुन वजन complete करायच हे कुठपर्यंत चालेल. एक महिना, दोन महिना, चार महिने झाले हो आता.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** नोटीस देऊन दंड करायच. आपण दंडासाठी बसलेलो आहे का, जळगांव स्वच्छ झालं पाहिजे. दंडच करायच असेल तर त्याला सांगा तु काम नको करु. आपण दंड देऊन देऊ.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** अहवाल मागवतो परत.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आयुक्त साहेब यांना विनंती करतो परत की ,माझ्या प्रभाग क्र. ५ जो मार्केट ऐरिया आहे, ऐवढा साफसफाईच्या दृष्टीने त्याच्यातले कर्मचारी कमी केले ते का केले सोहब तुम्ही दिवसाचे कर्मचारी काढुन रात्री टाकले रात्री त्यांना टाकले तुम्ही ते काम करण्यालायक आहे का १० ते १२ काम करता तुम्ही करता का ते पाहायला येतात का. काल एक घटना घडली बाईचा हात धरून घेतला . तुम्ही तिथं कमीत कमी पुरूष तरी ठेवायला पाहीजे होते. एक गोष्ट साफसफाई करायची आहे तर परंतु जर दिवसा हा प्रभाग जर होत नसेल किंवा रात्रीच्या वेळी जी कामाची पध्दत असेल मागची पध्दत असेल त्याच्यावरून काम केलं तर आमची हरकत नाही. परंतु तुम्ही माणसं कमी केले आणि जो भवानी पेठचा मागचा एरीया सुटला होता तो आता जो काही भाग आता जोडला आहे आमच्या प्रभागाच्या याच्याने जर तसं पाहीयला गेलं मी मागच्य वेळेस सांगीतलं होतं १११ या भागामध्ये कर्मचारी पाहीजे १२० /१२२ पर्यंत तुम्ही देतात ९० कर्मचारी त्याच्यातुन ४ काढतात ५ काढतात रात्रीच्या साठी साफसफाईचं कशाच्या भरवश्यावर करताहेत तुम्ही प्रयत्न करताहेत.उपायुक्त म्हणुन पण तुमच्या हाताखालचे लोकं काम करताहेत का. गटारी साफ होत नाही . लेले संकुल आहे तेथील डॉ. भागवत यांचा फोन आला बळीराम पेठ मधुन की आमच्या गटारी पुर्ण तुडुंब भरल्या आहेत.अहो मागच्या हप्त्यामध्ये ज्या दिवशी फडणवीस साहेबांचा शपथविधी झाला त्या दिवशी शहराचे आमदार तुकाराम वाडीमध्ये काय पाहायला गेले होते तर गआरी फुल झाल्या , आमदार स्वत: फोटो आलेला आहे पेपरमध्ये म्हणजे गटारी पाहायला सुध्दा आमदाराला जावं लागतं मग साफसफाई आहे कुठे आपली , तुकाराम वाडीचं पुर्ण कंम्पलीट मागील सर्व गटारी भरलेल्या होत्या . मग ते कर्मचारी कुठे आहेत.मग गटारी साफ होत नाही का आपल्या

**उपायुक्त , आरोग्य :-** काही एरीया मध्ये आपल्याला कर्मचारी घ्यावयाची आवश्यकता भासते म्हणजे खाजगी याच्यामधुन म्हणजे ती संख्या साधारणत: २५ पर्यंत जाते आता आयुक्त साहेब ट्रेनिंग साठी बाहेरगांवी आहेत . तिथं मी पुढच्या आठवडयात ते येतील आयुक्त साहेबांनी हेच म्हटंलेलं आहे त्यांचे अप्रुवल घेवुन आम्ही जसे वॅार्ड क्रं. ५ असेल आणि काही प्रमाणात सेग्रीगेशनला लागतील असे आम्ही खाजगी कमर्चारी घेवु . दुसरा मुद्दा असा की गटार आणि रस्ते साफसफाई करण्यासाठी ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्त केलेली आहे.त्यांना कामाचं नियोजन करून देण्यात आलेलं आहे.मागच्या आठवडयात किंवा याच आठवडयात मी ३ वॅार्डांची तपासणी केलेली आहे. तिन वॅार्ड मध्ये सुध्दा मी खाजगी ठेकेदाराच्या माणसांची सुध्दा मी अबसेंटी लावलेली आहे. आणि ज्या कर्मचाऱ्यांनी काम केल्यानंतर रिपोर्ट केलेला आहे , अशा कर्मचाऱ्यांना सुध्दा मी दंड लावलेला आहे. म्हणजे अजिंठा चौफुली ते नेरी नाका हा एक भाग होता . त्या दिवशी दोन महिला कर्मचाऱ्यांची रस्ता झाडण्यासाठी तिथं नियुक्ती होती .मी बरोबर दिड वाजता त्या ठिकाणी गेलो .तर दिड वाजता ते कर्मचारी मला हजेरी शेड वर दिसले . जे की त्यांनी दोन च्या दरम्यान हजेरी शेड वर असणं अपेक्षित आहे.त्याच्या नंतर त्यांचा मी तो एरीया तपासला तिथल्या मोकादम आणि सॅनिटरी ईन्सपेक्टर सोबत त्यांनी कोणत्याही प्रकारची झाड झुड बिलकुलही केलेली नव्हती .त्यांची मी अबसेंटी लावली दोघंची त्या वॅाटर ग्रेस ला नोटीस दिली की तुझे कर्मचारी काम करत नाहीत . आणि आमचे जे मोकादम होते त्यांनी याबाबतचं योग्य रिपोर्टीग केलं नाही.त्यांनाही मी दंड लावलेला आहे. दुसरा की वॅार्ड क्रं. पिंप्राळा भागातही गेलो होतो तेथेही सफाई कामाबाबत त्रुटी आढळली त्यांनाही मी दंड केलेला आहे. त्याच्यानंतर वॅार्ड क्रं. ६ मध्ये सुध्दा गेलो होतो . काही कर्मचाऱ्यांना दंडात्मक कार्यवाही करणं गरजेचं आहे. मा. आयुक्त साहेबांनी सुध्दा तसे लेखी आदेश काढलेले आहेत की कर्मचाऱ्यांना सुध्दा काम करत नाही तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे. तर त्या अनुषंगाने आमचा प्रयत्न असा आहे की एक एक वॅार्ड तपासणे आणि काही वॅार्डमध्ये कामं सुधारल्याचे दिसुन येते म्हणजे गटार साफ आहे. म्हणजे जसं भोईटे शाळेचा जो वॅार्ड आहे तिथं चेतन हातागडे म्हणन आहे. सन्मा.नगरसेवकांशी माझं दोघांचही बोलणं झालं की वॅार्डच्या गटार सफाईची गुणवत्ता वाढलेली आहे.त्या बाबत मी समाधानी आहे. तर अशा पध्दतीने इतर वॅार्ड मध्ये सुध्दा आम्ही तपासणी करू.जे कामचुकार असतील त्यांना आम्ही दंडात्मक कार्यवाही करू.

**मा.सभापती :-** विष्णु भाऊंनी आता सांगीतलं की महिलेचा हात धरला. तर मी सांगते की कायद्याने सुध्दा रात्रीच्या वेळी आपण महिला कर्मचारी ठेवु शकत नाही.याची आपण तातडीने नोंद घ्यावी आणि कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याचीही दक्षता घ्यावी.

**श्री.नितीन बरडे :-** आता दंड आकारण्याचा प्रमाण थोड कमी झालेल आहे. तुम्हालाही माहिती आहे मला ही माहिती आहे. मी तुम्हाला नंतर सांगेल. आता तुम्ही भोईटे हायस्कुलचा विषय केला.भोईटे हायस्कुल समोर भोळे साहेबांचा घर आहे. भोईटे कॅम्प्लेक्स ते नाल्यापर्यंत आणि भोळे साहेबांच्या घराच्या मागची नाली मला काढुन दाखवा. मी बांधकामाला ही सांगतो आरोग्यालाही सांगतो. कारण ती नाली बांधतांना भोळेसाहेब शहर अभियंता होते. आज पण ती नाली वाहत नाही. त्यात काही त्रुटी आहेत. चुकीचा बांधकाम झाला आहे. पण ती नाली मला क्लियर करुन द्या. बांधकाम विभाग आणि आरोग्य विभाग दोन्ही जण.

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- एकच लेव्हलला आलेले आहे. त्यामुळे मी आरोग्याधिकाऱ्यांना ही प्रत्यक्ष दाखवुन दिलं. यांनी सांगितल की मला तो स्लॅब तोडुन द्या. काल खाजगी माणसाकडुन यांना स्लॅब सुध्दा तोडुन दिलेला आहे. सन १९८६ साली ज्या वेळेस आपण मार्केट बांधलं.पुर्ण त्या नाल्यावर स्लॅब टाकलेला आहे आणि सन १९८६ पासुन तो नाला कधीही साफ झाला नाही.त्यातुन आपली ३६ इंची पाईप लाईन क्रॉस गेलेली आहे. आता ते ३६ इंची पाईप लाईनला जे काही गाळ आहे तो पॅक बसलेला आहे. ३६ इंची लाईनवरुन पाणी वाहत आहे नाल्याचं त्याच्यामुळे जी येणारी क्रॉस गटार आहे ती नाल्याला मिळत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब याचं कारण काय आहे , मी स्वत: पाहीले आहे ते , भोळे साहेब शहर अभियंता त्यांचं घरासमोरचं कामं अशा मक्तेदाराने घेतलं की भोळे साहेब सुध्दा बोलु शकले नाही त्यांना त्यामुळे भोळे साहेबांच्या घरासमोरचेचं काम व्यवस्थित होत नाही तर शहरतील कामे काय व्यवस्थित होतील. भोळे साहेब ही सत्य स्थिती आहे की नाही .

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- नितीन भाऊ आज सकाळीचं मी सहा वाजेला उठलो व पाहीले की , सकाळी सहा वाजेला नाल्याला पाणी कमी असतं म्हणजे गटार ची लेव्हल कमी होती .त्यावेळी मी साहेबांना फोन लावला पण साहेबांनी उचलला नाही .मागे साहेब बोलले होते की त्यावेळेस मला बोलवा. आठ वाजता नाल्याचाही फ्लो चालु झाला आणि गटारीचाही फ्लो चालु झाला . त्याच्यामुळे ती गटार दिवसभर तुंबलेली राहते.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब तुम्ही नविन बनवा बनविता आहेत. नविन गटार करा ती

**शहर अभियंता, श्री.सुनिल भोळे** :- ही गटार कधी पासुन आहे भाऊ.

**शेख सईदा युसुफ :-** हमारे वार्ड मे कोई काम करणे के लिये आते नाही , गटार कामगार और झाडु कामगार , घंटागाडी भी आती नही , कचरा निकालने वाले भी आते नही . गटार काढणारे येतात .

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** मैने आदमी भेजे है , गटार साफ हो गई , मैने आदमीयो को बोला है की काम नही हुवा तो मै दंड लागऊंगा और मै खुद चेक करूंगा .

**श्री.चेतन सनकत :-** धन्यवाद आणि अभिनंदन करतो की , नविन पध्दत जी आपण सुरू केली त्याच्यामुळे काही परिणाम जळगांव शहरात दिसेलं त्याच्यासाठी मी आपले हार्दीक अभिनंदन करतो .साहेब मी ढकल गाडी बद्दल मागे माहिती मागीतलेली होती .

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** मक्तेदारला आपण ज्या ढकलगाडया दिलेल्या आहेत.पण तो घेवुन गेलेला नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आतापर्यंत तो का घेवुन गेला नाही .

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** त्यांनी २५ गाडया घेवुन गेलेले आहेत.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब त्याला ढकलगाडया उपलब्ध कोणी करून दिल्या पाहीजे ते सांगा.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** आपल्या ॲग्रीमेंट मध्ये आहे की देऊ.

**श्री.चेतन सनकत :-** ॲग्रीमेंट आहे का ?

**श्री. विष्णु भंगाळे :-** त्यांच म्हणण काय आहे. त्यांना द्यायचे आहे का गाडया. असे ॲग्रीमेंट मध्ये आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** सर तुम्ही मला लेखी दिली. तो पहिल्यापासुन मागे लागलेला होता.त्याच्या बद्दल काही मोघम उत्तर दिलं. आता ढकलगाडयांच मी बोलत आहे. तुम्ही मला उत्तर दिल. सदर कंपनीस ढकलगाडया उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.परंतु कंपनीने आज पावेतो ढकलगाडया पुरविलेल्या नाही. बरोबर हे तुमच्या सहीच पत्र. काल रात्री तुम्ही दिल.

**श्री. विष्णु भंगाळे :-** कधी दिल हे पत्र.

**श्री.चेतन सनकत :-** दोन महिन्यापासुन मी मागे लागलेलो होतो. तर काल अजुन एक पत्र मागीतल यांनी आणि त्या अनुषंगाने दिल. आता तुम्ही इकडे सांगत आहे की, त्याला दिलल आहे. तो पुरवत का नाही.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** काही ठिकाणी सुरु केलेल आहे त्यांनी.

**श्री.चेतन सनकत :-** तुम्ही लेखी दिलेली आहे. समजुन घ्या. म्हणजे तुम्ही खोटे उत्तर देत आहात. याच्यावरुन तुम्ही सिध्द करता की दिलेली आहे. तुमच्या सहीनीशी पत्र माझ्या हातात आहे की, काल रात्री पर्यंत त्यानी शहरात सुरु केलेल्या नाही. तुम्ही लेखी दिलेली आहे. मी मोघम बोलत नाही. आता तुम्ही म्हणत आहे की, दिलेली आहे याच अर्थ अस की, तुम्ही त्याला Manage झालेले आहे. लेखी काही वेगळ देत आहे आणि तोंडी काही वेगळं सांगत आहे.

**मा.सभापती :-** तुम्ही लेखी त्यांना दिलेल आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्यांच मागेपण पेपरात होत की, मी वाचल नाही तरी ही सही करुन दिली. तसा प्रकार आहे का ?

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** वाचुन केलेली आहे सही.

**श्री.चेतन सनकत :-** आता तुम्ही म्हणता की, काही प्रमाणात सुरु केलेले आहे. म्हणजे तुम्ही सभागृहाची दिशाभुल करत नाही का ?

**मा.सभापती :-** डॉक्टर साहेब तुम्ही त्यांना काल संध्याकाळी लेखी देऊन झालेल आहे की, मक्तेदाराला आपण गाडया दिलेल्या आहे.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** हो दिल्या आहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** हे जे वारंवार दिशाभुल करण्याचे उत्तर देत आहे. मागच्या वर्षाभरापासुन पाहतो, करतो, देतो, सांगतो अशे उत्तर देत आहे. तर त्यांना सुध्दा नोटीस काढण्यात यावी आणि त्यांच्यावर कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** मक्तेदाराने ४०० कामगार पुरविल्याबाबत पुरावा द्यावा. यांच्याकडुन लेखी उत्तर आलेले आहे. कामगारांची यादी प्राप्त झालेली आहे त्याची छायांकित प्रत देण्यात येत आहे. परंतु माझ्याकडे ती उपलब्ध झालेली नाही आणि ते सांगत आहे. आरोग्य निरिक्षक यांच्याकडुन प्राप्त करुन आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. म्हणजे ३ महिन्यापासुन ४०० कामगार पुरवत आहे याचा पुरावा नाही. परंतु ते म्हणत आहे की आहे. दुसऱ्या ठिकाणी सांगत आहे की, उपलब्ध करुन देतो. मग बिल कस काढल. सांगा. साफसफाईचा विषय वेगळा आहे आणि कचरा संकलनाचा वेगळा. ४०० कामगारांच बिल कोणत्या पध्दतीने काढल तुम्ही मला लेखी दिलेली आहे. तुम्ही मला लेखी दिलेली आहे. निरिक्षकांकडुन माहिती घेऊन सांगतो. निरिक्षकांकडुन जर तुम्हाला माहिती आलेली नाही. तर तुम्ही बिल कस दिल.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** आपण हजरीनुसार बिल काढल.

**श्री.चेतन सनकत :-** तुम्ही मला लेखी काय सांगत आहे. त्यांच्याकडुन लेखी घेऊन देतो. याच्या आगोदर जे होत ते तर दिल पाहिजे होत.

**मा.उपायुक्त, आरोग्य विभाग :-** आज रात्री ८-९ वाज्यापर्यंत सर्व यादी त्यांना देण्यात यावी.

**श्री.चेतन सनकत :-** काल वाटरग्रेसचा प्रतिनिधी आला होता बसला होता. त्याच्याशी भेटीगाठी , चर्चा त्या सुरु होत्या. त्या संदर्भात अधिकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो कॅन्ट्रॅक्टरवर जास्त लक्ष देणे संदर्भात. मी स्वत: तिथे उपस्थित होता. दुसरा विषय त्यानी वाहनचालकांची यादी सादर केलेली नाही. मी सांगितल होत की, सर्व नगरसेवकांना द्या यादी की कोणता वाहनचालक माझ्या वार्डात आहे. दादांच्या वार्डात आहे, नितीन भाऊच्या वार्डात आहे किंवा विष्णु भाऊंच्या वार्डात आहे. त्यांना यादी द्या त्यांना मोबाईल नंबर द्या. पुर्ण शहराचा विषय आहे तो.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** हो यादी आज सकाळी माझ्याकडे आली.

**मा.सभापती :-** प्रशासनास माझी सुचना आहे की, आपण पुढची कार्यवाही पुर्ण करत नाही आणि चुकीची आणि अपुर्ण माहिती पुरविली जाते. आपण लेखी काय देत आहात, बोलतांना वेगळ बोलत आहात. आपल्यातच एक वाक्यता नाही.यांना जे लेखी दिलेली आहे ते आपणच दिलेल आहे डॉक्टर साहेब. बाकी आता तोंडी आपणच सांगत आहात.अस नाही की, एका विभागाचे वेगवेगळे कर्मचारी येथे बोलत आहे. एकाने लेखी दिल आणि तोंडी सांगायला वेगळा व्यक्ती आहे. ही खुप मोठी चुक आहे. त्यांना लेखी देऊन झालेल आहे. लक्षात घ्या आपण. त्यांचे अनेक प्रश्न उपस्थित होणार आहे. लेखी घेण्यापुर्वी पुर्ण माहिती घेणे अपेक्षित होत. जे जे प्रश्न त्यांनी विचारलेले आहे ते मागच्या स्थायी मधील आहे म्हणजे आठ दिवसापुर्वीचे आहे. आठ दिवसानंतर तुम्ही काय उत्तर दिले. त्याबद्दलची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही ती मी घेऊन सांगतो. हे उत्तर आपलं कितपतं बरोबर आहे कितपतं जबाबदारीचं आहे. यानंतर जर सभागृहात सन्मा.सदस्यांची मागणी येत असेल की आपल्याला शोकॉज नोटीस का देण्यात येवु नये .याच्यावर आम्ही काय उत्तर द्यायचं.

**आरोग्यधिकारी, श्री.विकास पाटील:-** ती माहिती आहे माझ्याकडे

**मा.सभापती :-** हा विषय आरोग्य विभागाशी संबंधित आहे. आणि हे सगळं खुपच सिरीयस नोटवर सुरू आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** याच्यामध्ये मा.सभापती महोदय , याच्या बाबतीत आरोग्य सभापती किंवा सन्मा .सदस्यांची जी काही पत्र माझ्याकडे आलीतं त्या सर्व पत्रांची माहिती रात्री आठ वाजु द्या किंवा नऊ वाजु द्या पण त्यांची सर्व माहिती आजच्या आज उपलब्ध करुन दिली पाहीजे. जनरल बॉडी साठी सुध्दा साहेबांनी सांगीतलं.

**श्री.विष्णु भंगाळे :-** जनरल बॉडी चा विषय नाही कारण तुम्ही ते जनरल बॉडी कडे टाकलं आहे. मला तेव्हा ते पत्र मिळेल मग

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** साहेब तुम्ही एकाच विषयाची माहिती दोन मुद्दे करून मागणी करून दिलेली आहे.

**श्री.चेतन सनकत :-** मी महिन्यापासुन माहिती मागतोय आणि दोन वेळा पत्र दिलं गेलं आणि मग त्यांनी मला काल माहिती दिली. मागच्या मिटींगमध्ये मी बोललो होतो की राजीनामा देतो आरोग्य समितीच्या सभापती पदाचा त्या अनुषंगाने ते आता जागे झालेले आहेत. आणि आता दुसरा विषय असा आहे की आपण काल की परवाचा आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , मी आपलं या विषयाकडे लक्ष वेधु ईच्छितो की , आरोग्य सभापती चं काम जर त्यांच्या अधिपत्याखाली आरोग्य समिती आहे .जर आपण महापालिकेत ज्या विविध समित्या बनविलेल्या आहेत तर त्याचं काम सुरळीत सुरू आहे का . ज्या शहराचं काम आरोग्य सभापतीच्या माध्यमातुन होत असेल आणि त्या सभापतीचं जर ऐकलं जात नसेल तर आम्ही काय समजावं आणि बाकीच्या सदस्यांचे कामं कधी होतीलं. दुसरी गोष्ट अशी की घंटागाडी सर्व २६ तारखेला का बंद होत्या. मी आयुक्त महोदयांना सकाळी ६ ते ७ वाजेला फोन केला . सकाळी ६ ते ७ वाजेला

उपायुक्त साहेबांना सुध्दा फोन केला . त्यावेळेस मला सकाळी सकाळी ४ ठिकाणांहुन फोन आले की आमच्या भागातं गाडी नाही , मग मी तपास केला तर ते म्हणाले भाऊ आज एकही गाडी नाही अशी परिस्थिती आहे , याचं कारण काय .

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** याचे असे आहे की कोणतेही ड्रायव्हर आपल्याला पुरविले नाहीत .त्यावेळेस भंगाळे साहेबांचा मला पहिल्यावेळेस फोन आला त्यावेळेस मी नाशिकला मिटींगला होतो.तर मी माहिती घेतली असता, त्याने पुरेसे वेतन न दिल्यामुळे त्या घंटागाडीचे जे काही लोक आहेत त्या सर्वांनी काम बंद केले होते त्या दिवशी त्याबाबत आम्ही त्यांना दोन नोटीसा दिलेल्या आहेत. एक तर आम्ही आमच्या कडुन ड्रायव्हर ची सुविधा करतो आणि तुम्ही जर.

**श्री.विष्णु भंगाळे :-** सभापती महोदय , ते ड्रायव्हर जर आपल्या ठराव प्रमाणे , मुद्दयाप्रमाणे ठरले असेल त्याप्रमाणे की त्यांना वेतन देवु परंतु तीन महिने काम करून सुध्दा त्यांना वेतन देण्यात आलं नाही. आणि त्यावेळेस तीन महिन्याचं वेतन दिलं नव्हतं तर जवळ जवळ २५/११ ला त्यांना ६५००/- प्रमाणे वेतन देण्यात आलं. मगं हे आपल्या कायद्यात बसतं का.आणि तो धमकी अशी देतो की उद्या मी दुसरे ड्रायव्हर ठेवतो . म्हणजे तो ड्रायव्हर कडुन ६५००/- मध्ये काम करून घेईन आणि काही ड्रायव्हरना गरज आहे बिचाऱ्यांना कोणी खेडया वरुन येतात . कोणी कुठे राहतातं . ते बाहेरचे जेवणं करून दिवस काढतात.अशा परिस्थिती मध्ये ते काम करतात. म्हणजे तो धमकी देतो की तु नाही केलं तर मी दुसऱ्याला लावतो. म्हणजे ही अशीचं सर्कस चालु राहील का. आमच्या टायमाला समजुन घ्या आता हे ४० कामगार असतील .किंवा ड्रायव्हर असतील यांना कामावरून काढल्यानंतर यांना पगार ६५००/- रू देतो आणि हे जर गाडीवर नाही चढले तर तो म्हणतो की मी दुसरे कामगार लावतो. तरी किमान वेतन तरी आपले सफाई कामगार असेल किंवा गटार कामगार असेल.किंवा ड्रायव्हर असेल यांना कीमान वेतन देणं बंधनकारक आहे. याला आपण काही कारवाई केली का.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** याच्या मध्ये ठेकेदाराने जे कामगार नियुक्त केलेले आहेत. त्याच्यामध्ये त्याचा पी.एफ. , ईएसआय असले आणि एकुण वेतन जे असेलं.

**श्री.विष्णु भंगाळे :-** किमान वेतन कीती असायला पाहीजे ते सांगा. किमान वेतन आयोगाच्या नियमानुसार ड्रायव्हरला कीती वेतन त्याने दिलं पाहीजे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** त्याला ५४३/- रू पर डे केलेलं आहे त्याच्याप्रमाणे साढेबारा हजार काहीतरी ते वेतन होते . त्याच्यामधुन १२५/- रू ईएसआय ची रक्कम कपात होईल. आणि उरलेली रक्कम त्याच्या .

**श्री.विष्णु भंगाळे :-** उरलेली रक्कम म्हणजे कीती .काय पगार दिला जातो.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही कॅल्कुलेशन त्याचं आपल्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आपल्याकडे असलं पाहीजे ना साहेब.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ , ते सांगाताहेत उपायुक्त साहेब .

**श्री.विष्णु भंगाळे :-** दोन मिनिटं , साढेसहा हजार वेतन दिलं पाहीजे असं आहे का.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही , नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मग एवढ कमी देण्याचं कारण काय.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** तसे नाही त्याचं कॅल्कुलेशन आपल्याकडे केलेलं आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मग आपण ते आतापर्यंतचे चेक करायला पाहीजे , म्हणजे आतापर्यंत म्हणजे आपण १८ टक्क्याने जरी म्हटंत आणि मागचं पीएफ ही टाकलं तर त्याला १२ हजारापर्यंत पेमेंट गेलं पाहीजे.मी ईथे याच्यावर म्हणतोय.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** साढे दहा ते अकरा हजारा पर्यंत

**श्री.विष्णु भंगाळे :-** मग साहेब कुठे आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही आपल्याकडे त्यांना दिलेल्या वेतनाचे बिलं त्यांनी आपल्याकडे सादर करायचे आहेत बिला सोबत म्हणजे आम्ही ते तपासुनच पुढची प्रक्रीया करू. आणि माझ्याकडे अशी कंम्प्लेंट आलेली आहे की त्यांना पुरेशे वेतन मिळत नाही . तर मी त्या कर्मचाऱ्यांना सांगीतलं की तुम्ही आम्हाला एक लेखी द्यावं. म्हणजे तोही मुद्दा आपल्याला तपासुन घेता येईल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** साहेब आता आरोग्य सभापतींनी उत्तर मागीतलं तर आता म्हणताहेत की उत्तर उपलब्ध नाही. म्हणजे तुम्ही म्हणतात की आमच्या कडे टेक्नीकल , सगळे कागदं वगैरे तयार आहेत किंवा आमच्या ऑफीसला आहे . आणि काल सभापती महोदयांनी प्रश्न विचारला आहे आणि तुम्ही म्हणता की उपलब्ध नाही.

**श्री.चेतन सनकत :-** उपलब्ध नाही असे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** म्हणजे हा काय प्रकार आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** नाही माझ्याकडे नव्हते आले ते.

**श्री.चेतन सनकत :-** तुम्ही म्हणता आहेत की तुमच्याकडे सर्व माहिति लेखी उपलब्ध आहे. आणि मला आमचे सन्मा. आरोग्याधिकारी श्री.श्री.श्री.विकास पाटील साहेब यांनी लेखी दिलेलं आहे की, किमान वेतन देत आहे का याची आमच्याकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही .माहिती मिळाल्यास उपलब्ध करून देवु . हे पत्र आहे. आणि तो किमान वेतन प्रमाणे पेमेंट करत नाहीये हा माझ्या मोबाईल मध्ये फोटो आहे. तो २५० रू. प्रमाणे मजुरांना पेमेंट देतोय. हे बघा लेखी आहे. तुम्ही

म्हणताहेत त्याचे पुरावे आहेत. म्हणजे काय आरोग्य विभागात काय सुरू आहे हे तुम्हाला माहिती आहे की त्यांना माहिती आहे.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** किमान वेतन जे आहे . ज्यावेळेस तो किमान वेतन चा जो स्लॉट होता जो सहा महिन्यांनी बदलतो .तो मागच्या सहा महिन्याचा म्हणजे जुलैच्या नंतरचा असेल आमच्याकडे तर तो आमच्या आमच्या कडे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** तुमच्या कडे जो असेल तो आम्हाला द्यावा. किमान वेतन च्या बाबतीत काम करणार असेल जे असेल किंवा आरोग्य निरीक्षकाच्या माध्यमातुन जो काम करणार असेल त्या ठिकाणी वॉटर ग्रेस वाल्याने जो लावलेला असेल. कामगार यांची नांव आणि त्यांना मिळत असलेला पगार याचं ते स्पष्टीकरण ते आम्हाला हवं आहे.

**श्री.चेतन सनकत :-** आणि दुसरे असे की त्यांनी लेखी दिलेली आहे की पीएफ भरलेले नाही . त्याचे काही पुरावे नाही .धानादेश द्वारे पेमेंट केलेले नाही त्याचे पुरावे उपलब्ध नाही.

**मा.उपायुक्त , आरोग्य :-** धनादेशाचे डिटेल्स घेतले जातील त्याच्याकडुन

**श्री.विष्णु भंगाळे :-** कामगारांचे खाते उघडायला ईतका वेहा लागतोय . हा फंडाच वेगळा आह . सभापती महोदय काय चाललयं .

**श्री.चेतन सनकत :-** एक मी सांगु ईच्छितो आणि एक सुचना करतो मिटींग मध्ये जो पर्यंत त्याने मागच्या पेंमेंटचे वाटप केलेले आहे असं प्रशासनाच्या , नगरसेवकांच्या आणि कर्मचाऱ्याच्या लक्षात येत नाही. तिथपर्यंत पुढच पेमेंअ थांबवावे. कारण की तो पमेंअ घेतोय आणि ईकडे आमचे जळगांवकर नागरीक जे तिकडे काम करताहेत. ते आत्मदहनाचा प्रयत्न करताहेत म्हणजे काहीतरी तफावत आहे. जळगांवकर जो कोणी असेल तो जळगांवकर असल्याने माझा तो कोणी एक नातेवाईक असेल. किंवा काय असेल त्याच्याने काही नाही . पण तो एक जळगांवकर आहे.तो एक सफाई कामगार आहे.सफाई कामगाराची जर या पध्दतीने घुसमट होत असेल तर त्याला प्रशासन जिम्मेदार आहे. त्याचा प्रतिनिधी त्याच्या कानाखाली मारतोय तो कर्मचारी आत्मदहन करतोय ती पेपरला न्युज येतेय म्हणजे हे सर्व खोटं आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हा योग्य मुद्दा आहे.

**श्री.चेतन सनकत :-** म्हणजे उद्या दुसरा करेल .पण मक्तेदाराला कुठे लगाम लावणार नाही का तुम्ही .

**श्री.विष्णु भंगाळे :-** त्याचं काय कारण होतं. का आत्मदहन करत होता त्याचं उपायुक्त साहेबांकडुन उत्तर घ्यावं.

**श्री.चेतन सनकत :-** पेपरमध्ये असा उल्लेख होता की त्याने चुकीची माहिती दिली पत्रकारांना असा काहीतरी विषय होता.

**शेख सैईदा बी युसुफ :-** निलंबित कर दो फीर ठेकेदार को . वही बार बार फीर कर रहा है तो .

**मा.सभापती :-** या सगळयाच प्रकरणांत सर्वच सदस्यांच्या तिव्र भावना आहेत. साफसफाई होत नाही याचा परिपुर्ण अहवाल ठेवा स्थायी समोर .

**श्री.चेतन सनकत :-** माझी सुचनाची नोंद घ्यावी की त्यांच्या पध्दतीने कर्मचाऱ्यांना पेमेंटचे वाटप केलेले आहे की नाही . याची खात्री झाल्याविना दुसरा पेमेंट काढु नये .कारण की दुसरं पेमेंट काढतांना आता काल तो पेमेंट साठी येथे आला होता. जर कोणी अधिकारी त्याला गाडीत घेवुन फीरत असेल किंवा त्याला घेवुन कुठे बसतं असेल तर मी तिकडे पत्रकांराना पाठवुन देईल.

**श्री. विष्णु भंगाळे :-** कोणता अधिकारी होता.

**श्री.चेतन सनकत :-** कोणताही असो. मी फक्त एक सांगतोय .

**श्री. नितीन बरडे :-** तुमचं नाही ऐकल तर मग सभापतीचं काय ऐकतील.

**श्री. विष्णु भंगाळे :-** उपायुक्त साहेब या गोष्टीकडे लक्ष द्या. आमच्या खाला कधी बोलत नाहीत या गोष्टीसाठी समजण्याच्या गोष्टींसाठी त्यांना बोलावं लागतयं ठिक आहे . आमचे कामं होत नाही पण ते म्हणतात की तुम्ही बोलतात तर तुमचेचं काम होत नाही तर आमचे कामं कधी होणार आहेत.तर आमच्या सारख्यांनी काय करावं असं वाटायला लागलय आम्हाला उपायुक्त साहेब आपल्या काम करण्याची पध्दत कशी आहे हे मला माहिती नाही . आपण तिडकीने काम करण्याचा प्रयत्न करताहेत. परंतु आपल्या खालील अधिकारी करताहेत का ते आपल्याला विश्वास पात्र आहेत का . त्याचं काय . की असे आहे का ठेकेदाराकडे नाशिकला जायचे आणि त्याच्याकडुन काहीतरी घेवुन यायचे आणि चार लोकांना वाटुन द्यायचे असं काही आहे का .केलेलं आहे का असं तपास करा.

**श्री.सुनिल खडके :-** सभापती महोदय , एक विषय आहे एक शेतकरी आहेत सर्वे नं. ४१७/१ब/५ ही त्यांची असलेली मिळकत त्याच्यामध्ये त्यांनी भुमापन अधिकारी यांच्याकडुन त्या जमिनीचे मोजमाप करून नकाश आणलेला आहे तर त्यांना त्या शेताला कंपाऊंड करायचं होतं जेव्हा तो शेताला कंपाऊंड करायला गेला तर तिथे महापालिकेने रस्ता करून टाकलेला आहे. म्हणजे त्या शेतकऱ्याच्या शेतातुन आपल्या महापालिकेने डांबरी रस्ता केलेला आहे. तर त्याने ०५/११/२०१९ ला आपल्याकडे अर्ज दिलेला आहे. आणि नकाशा वगैरे सर्व तुम्हाला दिलेलं आहे तर त्याला कुठलीही माहिती दिलेली नाही आणि त्या शेतातुन रस्ता करतांना त्याला कुठलीही नोटीस दिलेली नाहीये . आणि नोटीस न देता डायरेक्ट रस्ता करता येतो का .

**श्री. विष्णु भंगाळे :-** करता येतो का असं विचारा.

**श्री.सुनिल खडके :-** असं तर व्हायला नको. शेतकऱ्याच्या शेतात तुम्ही रस्ता तयार कराल अस कस काय चालेल.

**श्री.शेख. नगररचना विभाग :-** त्या शेतात लेआऊट टाकलेला आहे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** शेतकऱ्याने टाकला आहे का

**श्री.शेख. नगररचना विभाग :-** नाही त्याने नाही टाकला आहे.

**श्री. विष्णु भंगाळे :-** मग त्याला माहिती न करता आपण असे करू शकता का, एवढे मला फक्त उत्तर पाहीजे. हो या नाही .

**श्री.सुनिल खडके :-** करू शकतो की नाही.

**श्री.शेख. नगररचना विभाग :-** आता जागेचे परिस्थितीनुसार

**श्री. विष्णु भंगाळे :-** म्हणजे आपण याआधी जे रोड केलेले आहेत ते आपण माहिती न देता रोड केलेले आहेत का

**श्री.शेख. नगररचना विभाग :-** याच्या जागेची पोझीशन अशी आहे की यांनी जे प्लॉट पाडलेले आहेत ते दुसऱ्याच्या जागेत जात आहेत. म्हणजे तो रस्ता ऑलरेडी .

**श्री.सुनिल खडके :-** मोजणी करून द्या त्याची

**श्री.शेख. नगररचना विभाग :-** ठिक आहे करून घेतो.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** कब्रस्तान च्या समोर एक रोड क्रॉसींग वर आपण एक कल्व्हर्ट टाकलेले आहे. त्यावरून नेहमी पाणी रोडावरून वाहतं असतं आणि आपण पावसाळयामध्ये जेसीबी वगैरे सर्व यंत्रणा आणुन तो गाळ काढुन घेतला तरी सुध्दा आता पाणी आहे ते वरुन रस्त्यावरुन वाहतं असत तरी आपले जे इंजिनियर आहेत नेमाडे साहेब त्या प्रभात चौकाचे त्यांना विचारले तर ते म्हणता की बि ॲन्ड सी चं आहे असं म्हणाले . तर शहरामध्ये बि ॲन्ड सी चं आहे का तर मग त्याला आता काय करावं लागेल काय करता येईल त्याला आपल्याला .

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** मी बि ॲन्ड सी चे इंजिनियर आहेत त्याच्याशी चर्चा केली होती त्याबाबतीत तर ते तो रोड कॉंक्रींट चा तयार करता आहेत.माझ्या माहिती प्रमाणे त्यांनी जैन इरिगेशन ची जी हे आहे ऑफीसेस वगैरे तिथे ऑलरेडी काम चालु आहे.ते काम आहे आपल्या मोहाडीच्या क्षेत्रात मोहाडी च्या क्षेत्रात ते काम करणार आहेत याचाच अर्थ हा आहे की तो जे पुलाचं काम आहे ते त्याचं आहे.तर मी त्यांना बोललो की तुम्ही जर कॉंक्रींट रोड तयार करता आहेत तर या तो स्लॉब जो खाली गेलेला आहे त्याला तुम्ही वर उचला ना तर त्याची काही प्रोव्हिजन नाही असे त्यांनी मला उत्तर दिलं. ते डिपार्टमेंटचं काम आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** मग आता आपल्याला काय करता येईल.

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** आपण त्यांना पत्र देवु.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** पण मग किती दिवसांपासुन असं चाललयं . काय याचं त्यांचा काही खुलासा आला आहे का .

**श्री.सुनिल भोळे, शहर अभियंता :-** लेखी नाही त्यांनी मला त्यांनी माझी आणि त्यांची चर्चा झाली होती त्यावेळेस त्यांनी मला सांगीतले होते की स्लॅब कल्व्हर्ट ची आमच्याकडे कुठलीही तरतुद नाही. कॉंक्रीट रोड त्यांनी घेतलेले आहेत.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सभापती महोदय हा रस्ता गणपती वगैरे जात असतात . हा एक स्टेट हायवे आहे आणि एक विचित्र असं दिसंत हे गटारीचं पाणी मोठया प्रमाणावर रोडावरून वाहतं. आणि रोडावरून वाहतं म्हणुन आपली सर्व यंत्रणा आपले बांधकाम वाले आणि आरोग्य वाले जेसीबीने हा जो आहे कल्व्हर्ट तो साफ करतो. तो तुडुंब वाहतो एखादेदिवशी एखादे वाहन पडेल आणि मोठा अनर्थ होईल तर याच्यातुन काहीतरी मार्ग काढला पाहीजे याच्यातुन आणि असे काही नाही की बि एन्ड सी चे आहे म्हणुन आपल्याला करता येत नाही हे काम करता येईल .

**श्री.नितीन बरडे :-** आमदार निधीतुन करता येईल.तुम्हीच सांगा ना करून देतील.

**श्री. विष्णु भंगाळे :-** ढेकळे साहेब तुम्हीचं सांगा त्यांना आमदार निधीतुन करायला.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपण आमदार निधीतुन करून टाका ते देणार नाहीत तर असे काही होवु शकतं नाही . हे काम करा भोळे साहेब फार वाईट परिस्थिती आहे आणि आपण कुणीतरी पडेल आणि विचित्र प्रकार घडेल आणि आपल्या माथ्यावर खापर फुटेल. त्यांची एनओसी घ्यावी लागेल असं साहेबांच म्हणणं आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मग त्वरीत करा.

**सौ.रेश्मा काळे :-** मागे मी एक विषय मांडला होता प्रशासनाने ते स्पॉटस दिले का .

**उपायुक्त (आरोग्य) :-** लोकेशन्स आम्ही फायनल केलेले आहेत. त्याच्याबद्दल भोळे साहेबांशी काल चर्चा झाली .फक्त त्याचं म्हणणं आहे की एक वेळ त्यांनी आरोग्य विभाग आणि नगररचनाचे इंजिनियर यांनी एकदा साईट व्हिजीट करावी . दोन तीन दिवसांत हया सगळया साईट व्हिजीट होवुन जातील.त्याच्यानंतर मग बांधकाम विभाग असेल आणि नगररचना पुढची कार्यवाही करेल.

**सौ.रेश्मा काळे :-** फुले मार्केट कडे जे जेन्टस आणि लेडिज टॉयलेट आहे ते बंद आहे .

**उपायुक्त (आरोग्य) :-** फुले मार्केट जवळ .

**मा.सभापती :-** फुले मार्केट मधील आणि दाणा बाजार याच्याजवळील लेडीज आणि जेन्टस टॉयलेट

**डॉ.विकास पाटील, आरोग्याधिकारी :-** पाहुन घेतो मी

**मा.सभापती :-** ताबडतोब सुरू करा ते. त्या का बंद आहेत त्याचा शोध घ्या आणि त्या ताबडतोब सुरू करा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./७९ दि.२२/११/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील जळगांव शहर मधील खोटे नगर चौक, मानराज पार्क चौक, इच्छादेवी चौक, कालिकामाता चौक, नेरी नाका येथील ट्रॅव्हल स्टॅण्ड, सिंधी कॉलनी चौक, प्रभाग चौक, काशिनाथ लॉज चौक, चौबे मार्केट चौक, पिंप्राळा स्मशानभुमी येथील महानगरपालिका मालकीच्या जागेवर सार्वजनिक वापराकरीता एकूण १०० नग (सिमेंट बाकडे) बेचेंस बसविणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१०,८६,०००/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२.प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./८० दि.२२/११/२०१९ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचेकडुन खरेदी करणे कामी रक्कम रु.१०,९५,३६०/- + रक्कम रु.१,१३,०५०/- असा एकुण रक्कम रु.१२,०८,४१०/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**